# अर्थबोधपत्रिका

(आर्थिक, सामाजिक विषयांवरील विविध माहिती पोचविणारे माध्यम)

अंक १८ नोव्हेंबर-डिसेंबर २००१


● वंशवाद : वांशिक हत्या ● अर्थव्यवस्था व संस्कृती

● संस्कृतींमध्ये संघर्ष की समन्वय ?

● श्रद्धा व तर्कबुद्धी : दहा सूत्रे ● जगाच्या पाठीवर.....स्त्री विश्व

● संशोधनासाठी सार्वजनिक निधी ?

● औषधांची चाचणी ● जागतिक भांडवलबाजार व भारत

● कालप्रवाहात.........



## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोधपत्रिकेविषयी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोधपत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन, नोव्हेंबर १९९८ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे मांडणे, तसेच विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी सोप्या शब्दांत देणे, हे या पत्रिकेचे उद्देश आहेत. विशेषत: अनेक विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

जानेवारी २००१ पासून अर्थबोधपत्रिकेचे तिसरे वर्ष सुरू झाले असून तिसऱ्या वर्षाचा हा सहावा अंक आहे. सलग क्रमांकानुसार हा अठरावा अंक आहे.

पुढील सहा अंक मिळविण्यासाठी देणगीमूल्य ५० रुपये (पन्नास रुपये फक्त) डिमांडड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टलऑर्डर/चेकने किंवा रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकात शेवटच्या पानावर देण्यात आला आहे.

**अर्थबोधपत्रिका : अंक १८ : नोव्हेंबर-डिसेंबर २००१**

**संपादक** : रमेश पानसे - **संपादन सहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर

**प्रकाशक** : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, 'अर्थबोध',रत्ना हॉस्पिटल जवळ ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

**मुद्रक** : एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :** संपादक, अर्थबोधपत्रिका,अर्थबोध,९६८/२१-२२, रत्ना हॉस्पिटल जवळ, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

फोन: ५६५७१३२ / ५६५७२१० ई-मेल : ispe@vsnl.com

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | ३ |
| (१) वंशवाद : वांशिक हत्या | ४ |
| (२) अर्थव्यवस्था व संस्कृती | ९ |
| (३) श्रद्धा व तर्कबुद्धी : दहा सूत्रे | १४ |
| (४) संस्कृतीमध्ये संघर्ष की समन्वय ? | १८ |
| (५) संशोधन : सार्वजनिक निधी व समाजहित | २२ |
| (६) औषधाची चाचणी व त्यातील नैतिकता | २४ |
| (७) जागतिक भांडवलबाजार व भारत | २५ |
| (८) जगाच्या पाठीवर..... बदलते स्त्री विश्व | २९ |
| (९) कालप्रवाहात....... | ३३ |


**सूचना** ● या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे. ● अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. फक्त लेख प्रसिद्ध केल्यावर 'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ● लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठवावा ही अपेक्षा आहे.

# शांततामय व मानवतावादी जगासाठी

गांधी हे अहिंसेच्या तत्त्वाचे आजच्या काळातील सर्वात मोठे प्रवर्तक असले तरी ते या तत्त्वाचे प्रणेते नव्हते. अहिंसा हा भारतातील हिंदू, जैन, बौद्ध या धार्मिक विचारप्रणालीचाच एक भाग आहे. गांधींचे मोठेपण असे की वैयक्तिक नीतीशी संबंधित असलेल्या या तत्त्वाला त्यांनी सामाजिक व राजकीय कृतीचे परिमाण दिले. दक्षिण आफ्रिकेतील वंशवादाविरूद्धच्या आपल्या वीस वर्षांच्या दीर्घ लढ्यात त्यांनी ही करामत केली,

गांधींनी आपली अहिंसक असहकाराची पद्धत केवळ परकी सत्तेविरूद्धच वापरली नाही तर ती देशांतर्गत वांशिक भेदाभेद नि अस्पृश्यता अशा सामाजिक पापांविरूद्धही उपयोगात आणली. खरोखरच त्यांनी त्यांची प्रत्येक कृती, प्रत्येक कार्यक्रम अहिंसेच्या पायांवर उभा केला. कारण, त्यांचे अंतिम ध्येय केवळ हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे नव्हते तर, माणसातील बंधुभावाचे होते. त्यांचा सत्याग्रह केवळ भारतासाठी बेतलेला नव्हता तर, तो सबंध विश्वासाठीच होता; त्यातून केवळ व्यक्तीव्यक्तींतीलच नव्हे, तर वेगवेगळ्या समाजगटांत नि राष्ट्राराष्ट्रांमध्ये परिवर्तन साधायचे होते. अगदी १९२०च्या सुरूवातीस, जेव्हा गांधी आशियामधील राष्ट्रवादाचे खंदे पुरस्कर्ते म्हणून जगासमोर आले, तेव्हाच त्यांनी 'जागतिक संघराज्या'चे स्वप्न लोकांपुढे ठेवले होते. १९२४सालच्या बेळगाव काँग्रेसपुढे बोलताना ते म्हणाले होते, "जगातील सज्जनांच्यापुढे, आज, परस्परांशी युद्ध करणारी स्वतंत्रराष्ट्रे नाहीत, तर परस्परांवर अवलंबून असणारी मित्रराष्ट्रे आहेत." गांधींच्या विचारांनी पेटवलेला संघर्ष केवळ जुलमी परकी सत्तेविरूद्ध नव्हता. तो होता ढिगाने वाढणाऱ्या अण्वस्त्रांविरूद्ध आणि विकसित राष्ट्रे करत असलेल्या अविवेकी नि अपव्ययी जागतिक साधनसामुग्रीच्या उपयोगाविरूद्ध.

जगातील अनेक अहिंसक चळवळींनी शोषितांची सुप्त शक्ती दाखवून देण्याचे कार्य केले आहे; तरीही गांधीजींच्या कल्पना नि कार्यपद्धती फारच थोडे प्रगल्भ लोक उचलून धरताना दिसतात. गांधीजीही, अर्थात, त्याच्या स्वीकाराबाबत भ्रमात नव्हते. त्यांनी आपले विचार हा अखेरचा शब्द मानला नव्हता; उलट एका व्यापक नैतिक चौकटीत माणसाचे आयुष्य सुखावह करण्यासाठी, ते विचार निरूपयोगी ठरले तर, त्यात आवश्यक तेवढे बदलही होऊ शकतील, असे त्यांनी मानले होते. त्यांचे सखोल चिंतन हे शांततामय व मानवतावादी जग घडविण्यासाठी धडपडणाऱ्या अनेक विचारवंतांनी आपलेसे केले आहे.

*('इन सर्च ऑफ गांधी' या बी.आर. नंदा यांच्या आगामी ग्रंथातून)*

# संपादकीय

जागतिक युद्धाच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर हा अंक वाचकांच्या हाती येत आहे. युद्धे आणि वांशिक दंगली यांनी आधुनिक माणसाचा इतिहास भरलेला आहे. त्यातही वांशिक दंगलीतून होणारी मानवी हत्या युद्धांपेक्षाही कितीतरी अधिक आहे. आणि धर्म, वंश यांमधून माणूस मानसिकदृष्ट्या अजूनही कसा बाहेर पडू शकत नाही याचे दिग्दर्शन या अंकातल्या पानांमधून केलेले आढळेल. अर्थात, यातून बाहेर पडले पाहिजे आणि माणसामाणसांतले संबंध माणूसकीच्या पायांवर, परस्पर सहकाराच्या पायावर उभे राहिले पाहिजेत, असे सामान्य माणसांना नि विचारवंतांना एकाचवेळी वाटते आहे, याचीही चिन्हे, याअंकांतील लेखांमधून वाचक हेरू शकतील.

या अंकाचे लेखन पूर्ण करतानाच व्ही. एस. नायपॉल यांना वाङ्मयाचे नोबेल पारितोषिक प्राप्त झाल्याची बातमी आली. वंशवादाशी संबंधित विषयावरील आलेल्या त्यांच्या नव्या कादंबरीची, खुशवंतसिंग यांनी करून दिलेली ओळख आम्ही वाचकांपर्यंत पोचविली आहे.

वाचकांचे खास लक्ष वेधायचे आहे ते आजच्या जागतिक वातावरणाच्या संदर्भात, अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या सॅम्युअल हंटिंग्टन यांच्या संस्कृतीवरील ग्रंथाकडे. हा ग्रंथ व त्यातील स्फोटक विचार बरेच वादग्रस्त ठरले आहेत. या ग्रंथातील एका विषयाची थोडीशी तोंडओळख एका लेखात दिली आहे. तसेच तर्कबुद्धी आणि श्रद्धेच्या संघर्षातील, नेहमीचे मुद्दे टाळून केलेले वेगळे विवेचनही वाचकांना विचारप्रवृत्त करेल याची खात्री वाटते.

मागील दोन अंकांपासून 'कालप्रवाहात' असे एक सदर सुरू केले आहे. वाचकांना थोडक्यात पण महत्त्वाचे विषय वाचायला मिळावेत, या हेतूने यामधील माहिती संकलित केली जाते. या अंकापासून 'जगाच्या पाठीवर' असे आणखी एक नवे सदर प्रयोग म्हणून देत आहोत. एकाच विषयावर, पण विविध देशांतून काय घडते आहे, याचा मागोवा या सदरामध्ये घेण्याचा प्रयत्न आहे. यावेळी स्त्री विश्वाचा वेध त्यामध्ये घेतला आहे.

वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया कळवाव्यात, अशी आमची नेहमीच अपेक्षा असते; कारण त्यांच्या आधारेच आम्ही 'अर्थबोधपत्रिके'तील मजकुरात नवे काही आणण्याचा प्रयत्न करीत असतो.

सामाजिक

# वंशवाद : वांशिक हत्या

जगात युद्धांविषयी चर्चा फार मोठ्या प्रमाणावर होते, कारण, युद्धे ही संहारक असतात; मालमत्तेची हानी होते आणि हजारो लोक मृत्युमुखी पडतात. आजवर, जगाच्या पाठीवर, युद्धांमुळे झालेल्या मृत्यूंची संख्या काही कमी नाही. पण, म्हणून, युद्धे हीच सर्वात जास्त माणसांच्या मृत्यूस कारणीभूत होणारी गोष्ट आहे असे वाटत असेल तर ते चूक आहे. युद्धांपेक्षाही जास्त लोक वांशिक कत्तलींमुळे मारले जातात ही वस्तुस्थिती आहे. विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंतच्या काळात, युद्धात मरणाऱ्यांची संख्या ४कोटी आहे, तर, वांशिक हत्याकांडात १३.३ कोटी लोकांची हत्या झालेली आहे. विसाव्या शतकात झालेल्या युद्धांमध्ये १७कोटी लोक नाहक मारले गेले आहेत. यावरून वंशवाद, वांशिक दंगली, वांशिक कत्तली यांचे गांभिर्य लक्षात येईल.

वांशिक हत्यांचे स्वरूप असे असते की तो एखाद्या व्यक्तीच्या नव्हे तर एखाद्या गटाच्या विरोधातला गुन्हा असतो. त्यात व्यक्तीसंख्येपेक्षाही एखादा मानवी समूह पूर्णतः वा अंशतः नष्ट करण्याचा हेतू प्रधान असतो. तसेच वांशिक हत्येच्या व्याखेत प्रत्यक्षपणे केलेल्या हत्यांचाच समावेश असतो असे नाही, उदाहरणार्थ, स्टालिनने १९३२-३३ मध्ये युक्रेनमधील सर्व अन्नधान्य जप्त करून कृत्रिम दुष्काळ निर्माण केला, आणि त्यात भूकेपोटी ४०-५० लाख युक्रेनियन्स मृत्युमुखी पडले, तेव्हा हा प्रकारही वांशिक हत्यांचाच प्रकार मानता येईल. हिटलरने कित्येक जिप्सी लोकांचे, त्यांची प्रजा पुढे वाढू नये म्हणून सक्तीने निर्बिजीकरण केले, हा प्रकारही वांशिक हत्येचाच प्रकार आहे. ऑस्ट्रेलियात १९६० सालापर्यंत अंमलात आणलेली तेथल्या आदीम आदिवासी जमातीतील मुलांची केलेली विभागणी याच सदरात मोडते. तेथे मुलांपैकी जी मुले पूर्णत आदिवासीच होती त्यांची रवानगी चर्चेसच्या किंवा सरकारी वसतीगृहात करण्यात आली, मात्र ज्या मुलांमध्ये गोरेपण आणि गोऱ्यांचे रक्त होते अशांना गोऱ्या पालकांच्या हवाली करण्यात आले.

ताज्या घटनांमध्ये, अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारतींवरील हल्ल्यानंतर अमेरिकेने दहशतवादाविरुद्ध जी पावले उचलली आहेत, त्यात अफगाणिस्तानला पाकिस्तानकडून होणारा अन्नधान्य पुरवठा बंद करण्याची

मागणी केली आहे. असे झाले तर, दहशतवादाशी काहीही संबंध नाही असे हजारो अफगाणी नाहक भूकबळी होतील. असे नॉम चॉम्स्की यांनी, अमेरिकेच्या परकीय धोरणांवर टीका करताना म्हटले आहे. हेही एक प्रकारे वांशिक हत्येचे उदाहरण ठरेल.

इतिहासात गेली हजार वर्षे, अशा दंगली नि हत्याकांडे चालूच आहेत. इ.स. १२२१ मध्ये पर्शियात झालेले हत्याकांड हा एका व्यक्तीने केलेला जागतिक उच्चांक मानता येईल. चेंगिजखानचा जावई निंशापूरच्या हद्दीतून आलेल्या बाणामुळे मरण पावला, तर त्याचा सूड म्हणून चेंगीजखानाने १७-१८ लाख लोकांची हत्या घडवून आणली. असेच प्रत्येकवेळी लाख, दीड लाख लोक मारण्याचे एक-दोन विक्रम चेंगीजखानाच्या नावावर आहेत. चेंगीजखानपासून तैमुरलंगपर्यंतच्या मोंगलांनी सुमारे दोनशे वर्षात, पर्शियन, हिन्दुस्थानी, अरबी, रशियन, युरोपियन, चिनी लोकांची केलेली कत्तलींची संख्या सहज ३ कोटींच्या वर जाते.

एखादा वंश संपूर्णपणे नामशेष करण्याचेही उदाहरण जगात आहे. ऑस्ट्रेलियात तास्मेनियन आदीम आदिवासींची सुमारे पाच हजाराची वस्ती १८०३च्या सुमारास होती, ती पुढील पंचवीस वर्षात जवळजवळ संपुष्टात आली. जे थोडे लोक उरले होते त्यांची जवळच्या बेटांवर हकालपट्टी करण्यात आली. तृगानिब्दी नावाची शेवटची उरलेली तास्मेनियन स्त्री १८७६ साली मरण पावली आणि हा संपूर्ण वंशच नष्ट झाला. हे कृत्य गोऱ्या ऑस्ट्रेलियन लोकांचे होते. ऑस्ट्रेलियन इंग्लिश लोकांनी वस्ती केल्यापासून म्हणजे १७८८पासून ते १९२१ पर्यंतच्या काळात ऑस्ट्रेलियातील एकूण आदिवासींची संख्या तीन लाखांवरून साठहजारापर्यंत खाली आली. जी गोष्ट ऑस्ट्रेलियात घडली तीच अमेरिकेतही घडली. इ.स. १४९४ ते १५०६ अशा केवळ बारा वर्षांत सुमारे तीस लाख अरावक रेड इंडियन लोक मारण्यात आले. बर्टलोम नावाच्या इतिहासकाराने या कत्तलींचे वर्णन केले आहे. विष पाजणे, फासावर लटकवणे, शिकारी कुत्र्यांच्या तोंडी देणे किंवा माणसाचे तुकडे करून ते कुत्र्यांना खाऊ घालणे, असे अनेक क्रूर प्रकार यात मोडतात.

विसाव्या शतकातही वांशिक दंगली चालूच होत्या. ऑटोमन टर्क एंपायरमध्ये १९१५-१८ या काळात १५ ते २० लाख अर्मेनियन वंशाच्या लोकांना सिरियन वाळवंटामध्ये हद्दपार करण्यात आले, तेथे भूक, बलात्कार नि कत्तलींचे भाग्य त्यांच्या नशिबी आले. राजकीय कारणांनी होणाऱ्या वांशिक

कत्तलींचे तर विसाव्या शतकात पेवच पुटले आहे. हिटलरने केलेली ६० लाख ज्यूंची कत्तल जगजाहीर आहे, पण अर्थाच ती सर्वात मोठी कत्तल नव्हे. सोव्हिएट रशियात (१९१७-१९९९), ६ कोटी २० लाख नागरिकांची हत्या करण्यात आली आहे. त्या खालोखाल कम्युनिस्ट चीनमध्ये साडेतीन कोटी, नाझी जर्मनी दोन कोटी, चँग के शैकच्या कोमिंटंग चीनमध्ये (१९२८-४९) एक कोटी तर मिलिटरी जपान येथे (१९३६-४५) साठ लाख लोक मारण्यात आले आहेत.

अगदी अलीकडच्या काळात, जनरल सुहार्तोच्या अंमलाखालील इंडोनेशियाने पूर्वीची पोर्तुगीज कॉलनी पूर्व तिमोर वर आक्रमण करून, एकूण सहा लाख तिमोरीज लोकांपैकी ३३ टक्के लोकांची म्हणजे दोन लाख तिमोरीज लोकांची हत्या केली. १९९१-९२ साली युगोस्लाव्हियाची फाळणी झाल्यानंतर पूर्वीच्या युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मिलोसेविक यांनी केलेली क्रोएट्स आणि बोस्नियन वंशाच्या लोकांची हत्या आपल्या परिचयाची आहेच. सुमारे दोन लाख लोक मारून कित्येक लाख लोकांची हकालपट्टी करण्यात आली आहे. रवांदामधील दोन जमातीतील संघर्ष, खूपच भीषण होता. रवांदाचे हुतु जमातीचे हुकुमशहा जनरल जुवेनल हब्यारीमाना यांची ६ एप्रिल १९९४ ला हत्या करण्यात आली, आणि पाठोपाठ, याचा सूड म्हणून केवळ शंभर दिवसांत आठ लाख तुतसीजची कत्तल करण्यात आल्याचे वृत्त ताजेच आहे.

या वांशिक हत्यांचा काहीसा अनुभव हिन्दुस्थानच्या फाळणीच्या वेळेस आपल्यालाही आला आहे. सुमारे पाच लाख हिंदु-मुस्लिम-शिखांचे शिरकाण आणि एक कोटीपेक्षाही जास्त लोकांचे धार्मिक कारणांनी झालेले स्थलांतर हा राजकीय स्वरूपाच्या धार्मिक-वांशिक हत्यांचाच प्रकार मानावा लागेल. पूर्व पाकिस्तानातील, जनरल याह्याखान यांच्या कारकीर्दीत सुमारे १५ लाख लोकांची कत्तल झाली, अखेर १९७१ च्या युद्धात पाकिस्तानचा पराभव होऊन ही कत्तल थांबली.

वांशिक हत्यांच्या या आढाव्यात सर्वच हत्यांचा समावेश झालेला नाही. परंतु यावरूनही मानवी मनांची क्रूरता आणि हिंसांचे थैमान यांचे रूप स्पष्ट होईल. वांशिक, धार्मिक भावना किंवा राजकीय हितसंबंधांची तीव्रता या गोष्टी मानवाला जगण्याचा हक्कच नाकारण्याइतक्या महत्त्वाच्या का ठरतात? वांशिक हत्यांमागची मानसिकता तपासण्याचा प्रयत्नही मानसशास्त्राच्या क्षेत्रात तज्ज्ञांकडून केला जात आहे. स्टॅनले मिलग्राम, हन्ना आरेंद, नील क्रेसेल, पीटर

द प्रीझ अशा अनेकांच्या अभ्यासांतून काही कारणमीमांसा पुढे आली आहे.

समाजाच्या एखाद्या विशिष्ट वर्गाचेच लोक अशा विस्तारित हत्याकांडात सामील होतात असे नाही. उदाहरणार्थ, अलीकडच्या बोस्निया व हरगोविना येथे १९९१-९५ च्या कालावधीत झालेल्या हत्याकांडाची न्यायालयीन चौकशी नुकतीच सुरू झाली आहे. ज्यांची धरपकड झाली आहे, त्यात समाजातील सर्व स्तरांमधील लोक आहेत. त्यात एक माजी मेयर आणि वीस धर्मोपदेशकांचाही समावेश आहे. अगदी अलीकडे म्हणजे ८ जून २००१ ला दोन नन्सनाही पकडण्यात आले आहे. या नन्सनी, तुतूंच्या हत्यांसाठी पेट्रोल्सचे कॅन पुरवून ५००० तुतसीजच्या मृत्यूला जबाबदार ठरल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.

जेव्हा अशी संघटितरित्या मानवी हत्या घडते तेव्हा आक्रमक गटातील प्रत्येकाच्या मनात, नेत्याच्या आज्ञेचे पालन करण्याची तीव्र भावना असते. ॲडॉल्फ आयरिशमनने नाझी अंमलाखाली ज्यूंची कत्तल केली. तो म्हणतो, 'तेव्हा माझ्या मनात केवळ कर्तव्याची भावना जागृत होती, नेत्याची आज्ञा पालन करण्याची आणि अधिकारात पुढे सरकण्याची ईर्षा होती.' अशी जेव्हा कायदेशीररित्या नेत्याची आज्ञा शिरोधार्य मानून एखादे कृत्य केले जाते तेव्हा, व्यक्तिगत अपराधाची भावना असत नाही. 'मरावे की मारावे' अशीच जेव्हा टोकाची पर्यायांची स्थिती असते तेव्हा सामान्यमाणूस देखील, कधी स्वतच्या रक्षणासाठी किंवा कधी दुसऱ्याचा सर्वस्वी दोष आहे असे मानून, कधीही न केलेली क्रूर कृत्ये करायला तयार होतो, तर कधी कधी समोरचा शत्रू हाच अत्यंत अमानूष आहे, त्याला दया-माया दाखविण्याच्या लायकीचा तो नाही, असे मानून आपली नैतिकतेची नि विवेकाची बुद्धी, सामान्य माणूस दूर सारू शकतो.

युद्धांइतकी या वांशिक हत्याकांडाची दखल आजवर जगाने घेतली नाही हे खरे आहे. परंतु या वाढत्या हिंसेला आवरण्याचे काही तुरळक प्रयत्न मात्र चालू झाले आहेत. यापूर्वी १९४८ सालीच यूनोच्या जनरल असेंब्लीने वांशिक हत्या रोखण्यासाठी नि त्यांतील अपराध्यांना शासन करण्यासाठी आतंरराष्ट्रीय कायद्यानुसार वांशिक हत्या हा गुन्हा ठरविला आहे. परंतु, गेल्या अर्धशतकात निदान २५ तरी वांशिक हत्येच्या घटना घडूनही यूनो त्याला आळा घालू शकलेले नाही. उलट युगांडामध्ये १९७० च्या दशकात इदी अमीनच्या कारकीर्दीत सुमारे तीन लाख लोकांच्या झालेल्या हत्येच्या संदर्भात जेव्हा

यूनोच्या जनरल असेंब्लीपुढे तक्रार नोंदविण्यात आली, तेव्हा त्याविषयी चौकशी करण्याची विनंती यूनोने खुद्द इदी अमीनलाच केली होती. वास्तविक यूनोच्या या कन्व्हेशनवर भारतासह जगातील दोन-तृतियांश राष्ट्रांनी मान्यतेची सही केली आहे.

अलीकडे झालेल्या हत्याकांडांच्या संदर्भात मात्र गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाने लक्ष घातले आहे. कंबोडियाने ऑगस्ट २००१ मध्ये, यूनोच्या सहाय्याने स्पेशल ट्रायब्युनल नेमून, त्यावर एक कंबोडियाचा नि एक यूनोचा न्यायाधीश नेमला आहे, ही तयारी आहे ती, १९७५-७९ च्या दरम्यान माओ क्रांतिवादी खेमर रूजने पोलपॉट यांच्या नेतृत्वाखाली कंबोडियावर (तत्कालीन कांपुचिया) आक्रमण करून जे हत्याकांड आरंभले त्या संदर्भात चौकशी करण्याची. युनोने आता आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. आपल्या जुलै १९९८ च्या सभेत नवीन प्रस्ताव मांडून आंतरराष्ट्रीय न्यायालय स्थापन करण्याचे ठरविले आहे. जरी साठ देशांनी मान्यता दिली तरी ते उभे राहणार आहे. आजपर्यंत ३६ देशांची (यात भारत नाही) मान्यता याला प्राप्त झाली आहे. मुक्त व्यापार हक्काचा आग्रह धरणारे जग, मुक्त जगण्याच्या हक्काला काहीच महत्त्व का देत नाही ? विनाशापेक्षा विवेकाची वाट का धरत नाही ?

*(संदर्भ- 'द हिंदू' मधील के.अशोकबर्धन शेट्टी यांचा लेख)* ■■

## नायपॉल यांचा मिश्रवंशाचा शोध

व्ही. एस. नायपॉल यांनी लिहिलेल्या पुस्तकांबाबत दोन गोष्टी सांगता येतील. एक, ती विलक्षण वाचनीय आहेत; दोन, प्रत्येक पुस्तकात काहीतरी नवीन सांगितलेले आहे. शब्दांवर हुकमत असलेले ते श्रेष्ठ लेखक आहेत; इतिहास, विनोद, धर्म, वांशिक ताणतणाव, संस्कृतींचा उदयास्त अशा आणखी कितीतरी विषयात त्यांना रस आहे. 'हाफ अ लाईफ' हे त्यांचे पुस्तक मिश्रवंशीय कुळांबाबतचे आहे. अर्धजाती, मिश्ररक्तीय, गोरे-निग्रो आईबापांची संतती, युरो-आफ्रिकन्स आणि असेच अर्धगोरे, अर्धभुरे किंवा काळे. शारीरिकदृष्ट्या स्वीकार्ह कितीही असोत, पण जे लोक शुद्धरक्ताचे स्वाभिमानी आहेत, अशांची सामाजिक मान्यता मात्र यांना नाही. पुस्तकाच्या प्रास्तविकात नायपॉलयांनी म्हटले आहे की, "नवा शोध, हा नेमका देशांविषयीचा नाही, कालांविषयीचा नाही किंवा वर्णित घटनांविषयीचा नाही." प्रत्यक्षात ही कथा भारतात सुरू होते, पुढे ती इंग्लंडकडे सरकते आणि आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील पोर्तुगीज कॉलनीत तिची अखेर होते. मात्र प्रत्येक देशात मुख्य विषय आहे तो मिश्रवंशीय विवाहांचा. (संदर्भ - खुशवंतसिंग, 'आऊटलूक')

(यंदाचे वाङ्मयाचे नोबेल पारितोषिक नुकतेच नायपॉल यांना मिळाले आहे.)

# अर्थव्यवस्था व संस्कृती

संस्कृतीची फार चांगली व्याख्या किंवा लक्षण इरावती कर्वे यांनी सांगितले आहे. ते असे - "मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी; पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती." दुसऱ्या शब्दांत असेही म्हणता येईल की, सभोवतालच्या वातावरणात, निसर्गात म्हणजेच प्रकृतीत विकृती येऊ नये, यासाठी करावयाचे विविध सम्यक् संस्कार म्हणजे संस्कृती होय. विचारांचा व आचारांचा संयोग घडवून आणणारी ही संस्कृती परंपरेने मानवाला प्राप्त होत असते. संस्कृतीची निर्मिती, तिचा संचय व एका पिढीतून दुसऱ्या पिढीत, दुसरीतून तिसरीत अशी तिची संक्रांती होत जाणे म्हणजे संस्कृतीची परंपरा होय.

संस्कृती ही एका व्यक्तीची नसून ती समाजाची असते. नवी माणसे आधीच्या पिढीच्या सामाजिक-सांस्कृतिक परंपरा घेऊनच आपल्या जीवनक्रमाची सुरूवात करीत असतात. संस्कृती ही व्यक्तीच्या आयुष्याची दिशा निश्चित करते; तर व्यक्ती युगधर्माला अर्थात् देशकालाला अनुसरून संस्कृतीचा प्रवाह बदलीत असते. हवा, पाणी, सूर्यप्रकाश या गोष्टी जितक्या सहजतेने मानवाच्या जीवनांत सोबत करतात, तितक्याच सहजपणे संस्कृतीही मानवाचे अंतर्बाह्य जीवन व्यापून राहते. संस्कृतीसंबंधीचा असा विचार हा जुनाच असला तरी, आजच्या परिस्थितीत त्याचा, पुन्हा एकदा वेगळ्या संदर्भात विचार होतो आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत 'अर्थव्यवस्था व संस्कृती' असा विषय जागतिक पातळीवर चर्चेत आहे. आजच्या या युगात, कोणत्याही देशांतील व्यक्तीच्या वागणुकीवर सगळ्यात जास्त प्रभाव पाडणारे दोन घटक म्हणजे संस्कृती आणि अर्थव्यवस्था होय. नेमका हाच विषय मध्यवर्ती घेतलेले 'इकॉनॉमिक्स अँड कल्चर' हे, प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डेव्हिड थॉर्स्बी यांचे अतिशय अभ्यासपूर्ण पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. संस्कृतीची चांगली व्याख्या त्यांनी मांडली आहे. "संस्कृती म्हणजे मूल्ये, श्रद्धा, चालीरीती, परंपरा या सर्वांचा एकत्रित असा एक अशा प्रकारचा संच असतो की, जो एखाद्या समाजाला आपल्या कक्षेत बद्ध करतो." या व्याख्येचा आधार घेऊन, आजच्या

अर्थव्यवस्थेचा व संस्कृतीचा काही परस्पर संबंध आहे का ? या संबंधांमुळे संस्कृतीचे अर्थव्यवस्थेवर काही चांगले परिणाम होऊ शकतात का ? संस्कृतीचे आर्थिक आयाम व अर्थशास्त्राचा सांस्कृतिक संदर्भ कोणता ? अशा प्रश्नांचा शोध त्यांनी घेतला आहे. आजच्या अर्थशास्त्रात, उत्पादनातील विविध घटकांच्या क्षमता वाढविणे, उपभोगाला, बाजारपेठेला महत्त्व देणे आणि जास्तीत जास्त देशांमध्ये यासंबंधीची देवघेव वाढविणे यालाच प्राधान्य दिले जाते. पण अर्थशास्त्राच्या संकल्पनेतच समानतेचे तत्त्व सामावले आहे, त्याकडे मात्र दुर्लक्ष होते असे त्यांना वाटते. म्हणूनच समानतेकडे जाण्यासाठी 'अर्थ-संस्कृती' योग्य ठरेल का ? याचाही विचार ते करतात. 'इकॉनॉमिक्स अँड कल्चर' या पुस्तकातील 'कल्चर इन इकॉनॉमिक डेव्हलपमेंट' या प्रकरणात त्यांनी मांडलेल्या काही मुद्यांचा उल्लेख येथे केला आहे.

**संस्कृतीचे आर्थिक घटकांवर होऊ शकणारे परिणाम**

संस्कृतीच्या व्याख्येची व्यापकता लक्षात घेतली तर, संस्कृती ही व्यक्तीची व समाजाची 'आर्थिक वागणूक' ठरविण्यासाठी एक महत्त्वाची भूमिका बजावू शकते, हे स्पष्ट होते. अर्थिक वागणुकीवर संस्कृतीचे तीन प्रकारे परिणाम होऊ शकतात. एक, एखाद्या समाजाची संस्कृती लक्षात घेतली व त्यातील मूल्यांच्या आधारे उत्पादनवाढीच्या तंत्रात काही बदल केले तर, त्या समाजाची आर्थिक क्षमता वाढू शकेल. कारण, संस्कृतीच्या आधारे वेगवेगळ्या नव्या तंत्रज्ञानाला, बदलांना किंवा धोरणांना सामोरे जाण्यास मदत होते. दोन, संस्कृतीमुळे समानता वाढीस लागण्याची शक्यता अधिक आहे. म्हणजे, त्या समाजातील नैतिक तत्त्वांचा पुरस्कार जर समुहाने एकत्रितरीत्या केला तर, आपापसातील सहकार्याची, भावना वाढीस लागेल व परस्परांविषयी आस्था निर्माण होऊन समानतेचे तत्त्व आचरणात येऊ शकेल. तीन, व्यक्तीची व समाजाची आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे, ठरविण्यात संस्कृतीचा वाटा मोठा असू शकतो.

एखाद्या समाजाची संस्कृती मुळातच भौतिक विकासाला प्राधान्य देणारी असेल तर अर्थशास्त्रीय परिभाषेत त्यांचे मूल्यमापन करून, तो समाज यशस्वी झाला किंवा कसे हे ठरविणे सोपे आहे. पण एखाद्या समाजाची संस्कृती नेमकी याच्या उलटही असू शकते. तेव्हा त्या समाजाची प्रगती ही, त्या संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर व वेगळ्या मापदंडाने मोजली जाणे, हे योग्य ठरू शकेल. अर्थशास्त्रीय निकषांप्रमाणे 'कार्यक्षमतेचे निर्देशक' (efficiency indicator)

दरडोई उत्पन्न, तंत्रज्ञानातील बदलांचा वेग, बेरोजगारीची पातळी व दर इ. असून 'समानतेचा निर्देशक' (equity indicator) म्हणजे उत्पन्नाची विभागणी, सामाजिक कल्याणाच्या योजना, भविष्यकाळ डोळ्यापुढे ठेवून केलेली सार्वजनिक गुंतवणूक इ. आहेत. या सर्वांवर संस्कृतीचे परिणाम घडू शकतात. आतापर्यंत अर्थशास्त्राने याचा विचार केला नसला तरी आता तो करण्यात यावा, असे मत काही तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

**पूर्व आशियातील देशांच्या प्रगतीसाठी 'संस्कृती'च महत्त्वाची**

यासंदर्भात जपान, हाँगकाँग, कोरिया, तैवान, सिंगापूर या देशांच्या प्रगतीचा विचार केला तर असे आढळते की, विविध आर्थिक घटकांमुळेच या देशांची एवढ्या वेगाने प्रगती झाली ही वस्तुस्थिती आहे. स्पर्धेला सामोरे जाऊन त्यात यश मिळविण्याची जिद्द, निर्यात वाढविण्याची प्रचंड धडपड, तंत्रज्ञानातील बदलांना आत्मसात करण्याची प्रवृत्ती व विकासासाठी मनुष्यबळात गुंतवणूक करण्याला प्राधान्य या व इतर अशा बाबींमुळेच या देशांना आर्थिक प्रगतीचे टोक गाठता आले, हे मान्य करायलाच पाहिजे. पण त्याचबरोबर या त्यांच्या आचार-विचारांमागेच त्यांची 'संस्कृती' लपली आहे, हेही सत्य नजरेआड करून चालणार नाही. 'कन्फ्युशियानिझम'चा या नागरिकांवरील प्रभाव हा त्यांना, या आर्थिक विकासासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरला आहे.

'कन्फ्युशियानिझम'मध्ये समाजातील वेगवेगळ्या गटांचे कल्याण, परस्परांबद्दल विशेषतः वरिष्ठांबद्दल आदर, ध्येय गाठण्यासाठी असावी लागणारी मानसिकता व कार्यसंस्कृती (work culture), कुटुंबाचे महत्त्व, शिक्षणाची महती लक्षात घेऊन त्याला दिलेले प्राधान्य, अशा अनेक घटकांचा समावेश आहे.

जपानमधील संस्कृतीतही धर्म व कुटुंब यांना महत्त्व दिलेले आढळते. तसेच परस्परांना सहकार्य करण्याची भावना व ध्येय गाठण्यासाठी असावी लागणारी जिद्द, चिकाटी ही तेथील सामाजिक संस्कृती, तेथील औद्योगिक व आर्थिक क्षेत्रातही दिसून येते. जपानमधील नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारात त्यांची संस्कृती पदोपदी जाणवते, असे म्हटले जाते.

अर्थात, संस्कृतीचा आर्थिक घटकांवर व मानवी वागणुकीवर नेमका किती व कसा परिणाम झाला आहे, याची आकडेवारी व तत्सम अभ्यास अजून झालेला आढळत नाही. पण रोनाल्ड इंगलहर्ट या अभ्यासकाने विविध देशांतील व्यक्तींच्या वागणुकीचा व त्यांच्या सांस्कृतिक मूल्यांचा अभ्यास

करून त्याचा, त्यांच्या आर्थिक यशाशी संबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. याच अंगाने जाणारा पण काही वेगळा दृष्टिकोण मांडणारा अभ्यास सिन हुआंग मायकेल सियाओ यांनी केला आहे. तथापि यासंदर्भात संस्कृतीचा व अर्थशास्त्राचा आणखी अभ्यास होण्याची गरज आहे.

**तिसऱ्या जगातील राष्ट्रांचा आर्थिक विकास व संस्कृती**

विकासाची सुरूवातीची संकल्पना अतिशय संकुचित अशी, केवळ 'आर्थिक वृद्धी'ची होती. तिसऱ्या जगातील राष्ट्रांचा विकास करायचा म्हणजे काय ? तर केवळ दरडोई उत्पन्नाची पातळी वाढवायची. १९५०-६०च्या काळात त्यात सामाजिक विकासही जोडला गेला. १९७५ नंतर मानवकेंद्री विकास, १९९०च्या दशकात पुर्नविकास आणि आता विसाव्या शतकाअखेरीस सातत्यपूर्ण विकास अशा विकासाच्या संकल्पना बदलत गेल्या. (यासंदर्भातील विस्तृत विवेचन 'अर्थबोधपत्रिके'च्या अंक क्रमांक १२मध्ये, नोव्हेंबर-डिसेंबर २०००, 'विकासाच्या बदलत्या संकल्पना' या लेखात करण्यात आले आहे.) जीवनसातत्याची फार छान व्याख्या लीस्टर ब्राऊन यांनी केली आहे. "जो समाज, आपल्या भावी पिढ्यांच्या गरजा भागविण्याच्या शक्यता कमी होऊ न देता,आपल्या गरजा भागवतो, तो जीवनसातत्य टिकविणारा समाज होय. या संकल्पना बदलत असतानाच त्यात, 'संस्कृती'च्या विचाराने चंचुप्रवेश केला असावा. १९९८च्या एप्रिल महिन्यात स्टॉकहोम येथे 'इंटरगव्हर्नमेंटल कॉन्फरन्स ऑन कल्चरल पॉलिसिज फॉर डेव्हलपमेंट'चे आयोजन करण्यात आले होते. यात सुमारे १५० देश सहभागी झाले होते. यावेळी विकासविषयक विविध धोरणांमध्ये 'संस्कृती' या घटकाचा समावेश प्राधान्याने करण्याचा निर्णय घेण्यात आला. सातत्यपूर्ण विकासाच्या संकल्पनेत संस्कृतीला महत्त्व दिले तरच सातत्यपूर्ण विकासाच्या संकल्पनेला पूर्णत्व येईल, असे आता मानले जाऊ लागले आहे.

जागतिक पातळीवर देशादेशांमधील आर्थिक मदतीत आता संस्कृतीच्या मुद्याला महत्त्व मिळू लागले आहे. विशेषतः जागतिकीकरणाच्या या युगात संस्कृतीला तीन प्रकारे प्राधान्य देता येणे शक्य आहे. एक, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत एकच व्यापारी संस्कृती, चंगळवादी संस्कृती, उपभोगाची संस्कृती सर्वत्र पसरते आहे, असे म्हटले जाते, तिथे विविध देशांमधील स्थानिक संस्कृती जपणे हे त्वरित करण्यासारखे कार्य आहे. दुसरे, विकासाच्या विविध योजना राबविताना स्थानिक जनतेचा सहभाग, त्यांचे परंपरागत ज्ञान, तेथील छोट्या-छोट्या गटां -मधील संबंध, विकासाचा त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ अशा अनेक बाबींचा विचार आता

करायला हवा. थोडक्यात 'तळाकडून वर' (bottom up approach) अशा सुधारणांची अपेक्षा करता येईल. तीन, विकासाच्या योजना गरिबांसाठी राबविताना त्यांना अनेकदा प्रोत्साहन देण्याची गरज भासते. त्यांचा मानसन्मान, प्रतिष्ठा वाढण्यासाठी व गरिबी दूर करण्यासाठी त्यांच्याच संस्कृतीची मदत घेणेच योग्य ठरू शकते, हे आता पटू लागले आहे. आर्थिक विकास करताना संस्कृती नष्ट होत नाही, उलट ती टिकून राहते, हे लक्षात आल्यावर संबंधित नागरिकांचा सहभाग वाढण्यास मदत होऊ शकेल, असा विचार आता पुढे येत आहे.

जागतिक बँकेनेही संस्कृतीचे महत्त्व मान्य केले आहे. बँकेने म्हटले आहे की, (१) संस्कृतीतून मिळणाऱ्या ज्ञानाचा व क्षमतांचा उपयोग करून गरिबी दूर करणे शक्य आहे. (२) आर्थिक विकासासाठी मनुष्यबळासह सर्व प्रकारच्या स्थानिक संसाधनांचा वापर करणे हे सयुक्तिक ठरेल. (३) सामाजिक, सांस्कृतिक दृष्टिकोणातून विचार करून नैसर्गिक ठेवा जतन करून, स्थानिक केंद्र बळकट करून मगच पर्यटन व्यवसाय वगैरे वाढवून आर्थिक विकासाचा विचार व्हावा. (४) स्थानिक दुर्बल घटकांची क्षमता, शक्ती वाढवून त्यांनाही आर्थिक विकासाची फळे चाखायला मिळावीत, अशा योजना असाव्यात.

### अर्थ-संस्कृतीचा उदय

गेल्या पन्नास वर्षांत आर्थिक विकासाच्या संकल्पना काही प्रमाणात बदलत गेल्या आहेत. पण त्या बदलातही मूळ आर्थिक गाभा तोच राहिला. आणि तरीही जागतिकीकरणात आर्थिक विषमता वाढली असल्याचेच चित्र आढळते. आता मात्र ही विषमता वाढू द्यायची नसेल, तर व्यापक दृष्टिकोणातून अर्थशास्त्र व संस्कृती यांचा मेळ घालावा लागेल. विशेषत: तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या विकासाच्या योजनांमध्ये याचा विचार व्हायला हवा आहे. आर्थिक विकासाच्या परंपरागत समजुतीप्रमाणे ज्या देशांची प्रगती झाली आहे, अशा देशांमधील नागरिकही सर्व बाजूंनी सुखी आहेत, असे आढळत नाही. मनुष्याचे सुख हे केवळ दरडोई उत्पन्नाच्या आकडेवारीवर अवलंबून नसते, हा विचार आता प्रगत राष्ट्रांमध्येही बळावू लागला आहे. सध्याच्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीत अर्थशास्त्र परिपूर्ण व कालसुसंगत ठरावे असे वाटत असेल तर, नवी स्थानिक देश-काल संस्कृतीच्या पायावर उभी असलेली संस्कृतीआधारित अर्थव्यवस्था व्यवहारात आणावी लागेल. जागतिकीकरणात यापुढील काळात जागतिक नागरिकाच्या वागणूकीवर संस्कृती व अर्थकारण हे दोनच प्रभाव पाडणारे महत्त्वाचे घटक ठरण्याची शक्यता लक्षात घेऊन योग्य वेळीच सर्वकष व व्यापक विचार होणे हे आवश्यक आहे. ■■

# श्रद्धा व तर्कबुध्दी : दहा सूत्रे

आज वैचारिक पातळीवर जागतिक विचारप्रवाह धर्मनिरपेक्षतेच्या अंगाने विकसीत होत असला तरी व्यवहारात मोठ्या प्रमाणावर धर्मनिष्ठा, धार्मिक मूलतत्त्ववाद आणि धर्माधिष्ठित कार्ये यांची चलती दिसून येते. या परिस्थितीची शहानिशा करताना, रुडॉल्फ हेरिडिया यांना, श्रद्धा व तर्कबुद्धी यांमधील पेचाचा विचार करावा लागला. रुडॉल्फ हेरिडिया हे स्वतः जेझुईट असून समाजशास्त्रज्ञही आहेत. 'हिंदू फोलियो' मधील त्यांच्या एका लेखात त्यांनी या पेचाचे विवेचन केले आहे. आणि त्याची मांडणी दहा सूत्रांत केली आहे.

त्यांच्या मते, पाश्चात्य विचारसरणीत श्रद्धा आणि तर्कबुद्धी या दोहोंत स्पष्टपणे विरोध आहे, तर पौर्वात्य विचारधारेत या दोहोंत एक समजुतदार मेळ घातलेला दिसून येतो. या संदर्भात त्यांनी दिलेले पहिले सूत्र असे की, *श्रद्धा व तर्कबुद्धी या दोन्ही गोष्टी सत्यशोधनाच्या, परस्परविरोधी नव्हे तर परस्परपूरक अशा पद्धती आहेत.*

*श्रद्धा म्हणजे दुसऱ्या कोणाच्या तरी आधारावर सत्याचा स्वीकार करणे होय. त्यामुळे साहजिकच आपण कशावर विश्वास ठेवतो हे आपण कोणावर विश्वास ठेवतो यावरून निश्चित होते; ज्या गोष्टीवर विश्वास ठेवायचा त्याच्या आशयावरून नव्हे.* (सूत्र दुसरे)

एखाद्या व्यक्तीला काही दैवी प्रसाद प्राप्त झाला आहे असे मानून, किंवा ती व्यक्ती स्वतःच अथवा अन्य कोणी त्या व्यक्तीस देवाचाच अवतार मानून, मग त्याच्या शब्दावर, कथनावर लोक विश्वास ठेवतात. मात्र अशा दैवी प्रसादाने पावन झालेल्या व्यक्तीसही जे दैवी अनुभव येतात त्याचा प्रत्यय वैचारिक व भाषिक पातळीवर येत असतो. तो दुसऱ्यांकडे संक्रांत करतानाही विचार नि भाषा यांचाच आश्रय घेतला जातो. आणि हे तर्कबुद्धीचे काम आहे.

बुद्धिनिष्ठतेचा आधार घेणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत, त्यांना प्रतित होणारे सत्य असे दुसऱ्या कुणावर अवलंबून नसते; ती त्यांची स्वतःचीच अंतर्गत बाब असते. सत्याच्या आकलनाची त्यांची पद्धत श्रद्धेच्या वाटेने जात नाही तर ती 'ज्ञाना'च्या दिशेने कार्यरत होत असते. अर्थात, अशा प्रकारे होणारे तर्काधिष्ठित ज्ञानही बऱ्याचदा आपल्यापेक्षा अधिक ज्ञानी माणसाच्या आधारावरच आपण

व्यवहारात स्वीकारीत असतो. कारण ज्ञानाचा प्रत्येक कण स्वतःच्या तर्कबुद्धीवर घासून तपासणे अशक्यच असते, किंबहुना जगात अगोदरच अस्तित्वात असलेल्या ज्ञानाचे अस्तित्व आपण, तार्किकदृष्ट्या न तपासताच स्वीकारीत असतो. साहजिकच आपल्याला 'तर्काधिष्ठित ज्ञान' आणि ते ज्ञान प्राप्त करण्याची 'तार्किक पद्धती' या दोहोत फरक करावा लागतो. शिवाय तार्किक पद्धतीच्याही काही मर्यादा असतात आणि त्यांची दखलही घ्यावीच लागते. त्यामुळे असे एक सूत्र मांडता येईल की, *जी तर्कपद्धती आपल्या अंगभूत मर्यादांना धुडकावते ती खऱ्या अर्थाने 'बुद्धिनिष्ठ ज्ञानाप्रत' पोचणे अशक्य आहे.* (सूत्र तिसरे)

ज्ञानाचेही एक समाजशास्त्र असते, आणि ते असे दाखवून देते की तर्कपद्धतीच्या ज्या मर्यादा समाजात असतात त्या आपली गृहिते दूषित करीत असतात, नि तेवढ्या प्रमाणात आपल्या दृष्टीची वस्तुनिष्ठता आपण हरवत असतो. आपण अनेकदा अजाणतेपणाने किंवा हितसंबंधांमुळे एखाद्या विचारप्रणालीला चिकटून असतो. विचारप्रणालीतील अनेक मूलभूत बाबी आपण न तपासताच स्वीकारतो आणि मग त्यावर आधारित गोष्टींना तार्किकतेच्या बाहेरच ठेवले जाते. थोडक्यात असे की, *आपल्या (वैचारिक) स्थानावरच आपण विचार कसा करतो हे अवलंबून असते.* (सूत्र चौथे)

तर्कबुद्धीप्रमाणेच श्रद्धेच्या बाबतीतही आशय म्हणून असणारी श्रद्धा किंवा विश्वास आणि कृती म्हणून असणारी श्रद्धा किंवा निष्ठा यात फरक करावा लागतो. आपण शब्दप्रामाण्य का मानतो ? हा विश्वास कशातून निर्माण होतो ? दुसऱ्या कुणावर किंवा कशावर तरी निष्ठा ठेवल्याशिवाय आपण या परस्परावलंबी जीवनात तगू शकणार नाही, अशी आपली धारणा असते. अर्थात आपण आपले अस्तित्व हीच मुळी मानवाच्या हाती नसलेली घटना मानत असू तर मग ती पारलौकिक श्रद्धेचीच गोष्ट ठरते. याउलट, कोणतीही सत्य म्हणून जाणवलेली ही गोष्ट आपण अनुभवजन्यतेच्या क्षेत्रात आणून सोडली आणि सर्व ज्ञानाला तार्किकतेचाच आधार दिला तर मग मानवाशी निगडित असलेल्या कशातही श्रद्धेला काहीच स्थान राहत नाही. *त्यामुळे आपण एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवतो अथवा ठेवत नाही हे केवळ आपल्या स्वतःच्या आकलनावरच अवलंबून असते.* (सूत्र पाचवे) आपण स्वतः काय मानतो हे महत्त्वाचे असते. या अर्थाने आपण श्रद्धेकडे पाहिले तर श्रद्धा हीच मानवी जीवनाचा एक अंगभूत भाग ठरते. आणि तशी ती असेल, तर तिने

मानवाला 'अधिक मानवी' बनविले पाहिजे. *श्रद्धा ही जर अशा प्रकारे मानवी असेल तर आपण ज्यावर श्रद्धा ठेवतो त्या गोष्टीने आपल्याला 'अधिक मानवी' बनविले पाहिजे. अमानुष नव्हे.* (सूत्र सहावे) चांगल्या श्रद्धेचा हाच निकष मानला पाहिजे.

ज्याला आपण अंधश्रद्धा म्हणतो त्यात श्रद्धेची कृती ही मुक्त नसते तर तिची सक्ती असते. अर्थात त्यात एक प्रकारची सुरक्षितता असते, लोकांच्या नजरेतही आपण त्याद्वारे भरतो. पण त्यातून दुसऱ्यावरील विश्वास किंवा माणसांचे परस्परावलंबित्व मात्र दृश्यमान होत नाही. त्यामुळे माणसामाणसांमधील सहकारी संबंध व माणूसपण जपण्याची गरज ध्यानात येत नाही. *थोडक्यात असे की, 'अंध' असणारी श्रद्धा कधीही माणसाला 'माणूस' बनविणारी असत नाही; आणि जी माणसाच्या माणूसपणापासून दूर नेते ती त्या प्रमाणात अनिष्टच असते.* (सूत्र सातवे)

बऱ्याचदा श्रद्धेची योग्यायोग्यता ठरविण्यासाठी तर्कबुद्धीचा वापर केला जातो. परंतु त्याने श्रद्धेचे आकलन दुरापास्त असते. श्रद्धेचा अर्थ वेगवेगळ्या स्तरांवरून समजून घ्यावा लागतो; त्याच्या वेगवेगळया परी असतात. त्याचा जसा एक वाच्यार्थ असतो तसाच त्याला प्रतिकात्मक किंवा कधी लाक्षणिक वा रूपकात्मक अर्थ संभवतो. त्यामुळे त्याला प्रयोगांच्या निकषांवर सिद्ध करता येत नाही. त्याला त्याची स्वतःची अशी आगळीवेगळी पद्धत असू शकते. *श्रद्धा ही व्यक्तिनिष्ठ बाब असल्यामुळेही त्याला वस्तुनिष्ठ तार्किक पद्धत चालू शकत नाही. तिची आकलनपद्धती निजवाचक आणि अनुभवाधिष्ठित असावी लागेल; तरच ती अर्थपूर्ण ठरेल. म्हणजे व्यक्तिनिष्ठ असूनही ती तर्कदुष्ट असणार नाही.* (सूत्र आठवे)

जर एखाद्या प्रतित होणाऱ्या सत्याला काही अर्थ असेल, मानवी जीवनाच्या दृष्टीने मूल्य असेल, तर श्रद्धेच्या क्षेत्रात मुख्य भर 'विश्वासा'पेक्षा मानवी जीवनाच्या बांधिलकीवर असावा लागेल. त्याचप्रमाणे तर्कबुद्धीच्या संदर्भातही मुख्य भर तार्किक पद्धतीपेक्षाही तिच्या मर्यादा हेरणाऱ्या संवेदनशीलतेवर असावा लागेल. अशा अंगाने जर आपण श्रद्धा आणि तर्कबुद्धी यांमधील संबंधांकडे पाहिले तर ते अधिक उपयुक्त ठरेल. मग श्रद्धेची चिरफाड करताना, तर्कबुद्धी, तिच्या आशयापेक्षा आपल्या जीवनाचे मानवीकरण करणाऱ्या तिच्या प्रामाणिकपणावर लक्ष केंद्रित करील आणि श्रद्धासुद्धा, तर्कबुद्धीला, तिच्या मानवतावादी अंगानेच जोखून पाहील. श्रद्धावान आणि बुद्धिवादी यांची परस्परांकडे पाहण्याची दृष्टी बदलेल. ती अधिक मानवतावादी होईल.

याच आधारावर धर्माधर्मामधील संवाद साध्य करता येईल. *श्रद्धापूर्ण कृतींचा*

*आशय संस्कृतीनुसार नि धर्मानुसार भिन्न असला तरीही या श्रद्धापूर्ण कृती मूलत: मानवी असल्यामुळे, त्यांचा पाया भिन्न संस्कृती किंवा परंपरांमध्ये सुद्धा एकच असेल.* (सूत्र नववे) आजची परिस्थिती अशी आहे की, एका बाजूला आज होत असलेले धार्मिक पुनरुज्जीवन अविवेकाची कास धरत आहे; किंबहुना श्रद्धांच्या नावाखाली अमानुष पातळीपर्यंत जात आहे; तर दुसऱ्या बाजूला, बुद्धिनिष्ठ धर्मनिरपेक्षता सर्वच धार्मिक श्रद्धांना अशास्त्रीय नि अजाण ठरवीत आहे. यातून श्रद्धा नि तर्कबुद्धी यांमधील पेच टोकाला जात आहे; या दोहोंचा मेळ घालणे दुरापास्त होत आहे. *यासाठी खऱ्या मानवतावादी विचारात 'अर्थपूर्ण श्रद्धा' नि 'संवेदनशील तर्कबुद्धी' या दोन्हींनाही स्थान मिळावयास हवे.* (सूत्र दहावे) असे केल्यास आपण आजच्या जागतिक विघटनाला आळा घालून एकसंघ समाजनिर्मितीच्या दिशेने वाटचाल करू शकू. ■■

## संस्कृतींचा परस्परसंघर्ष धोकादायक

लेस्टर पियरसन यांनी, १९५०च्या दशकातच असा इशारा दिला होता की, माणूस अशा एका युगात प्रवेश करीत आहे की, "ज्या युगात वेगवेगळया संस्कृतींनी एकमेकांपासून धडे घेतले पाहिजेत, परस्परांचे इतिहास व आदर्श तसेच कला नि संस्कृती अभ्यासले पाहिजेत, त्यातून परस्परांचे जीवन समृद्ध केले पाहिजे, आणि शांततामय सहयोगी मार्गाने परस्परांबरोबर नांदायला शिकले पाहिजे. अन्यथा, गर्दीने वेढलेल्या या छोट्याशा जगाला, गैरसमज, ताणतणाव, संघर्ष आणि अचानक कोसळणाऱ्या महासंकटांना तोड द्यावे लागेल." शांतता व संस्कृतींचे भवितव्य हे अखेरीस त्यातील मोठ्या संस्कृतीतील राजकीय, आध्यात्मिक व विचारवंत अशा नेत्यांच्या समजुतदार नि सहकाराने वागण्यावरच अवलंबून आहे. या संस्कृतींचा संघर्ष उद्‌भवलाच तर शक्यता अशी आहे की युरोप नि अमेरिका एकत्र येतील किंवा विभक्तही होतील. जागतिक संघर्षात, म्हणजे सुसंस्कृतता नि रानटीपणा यांच्या 'खऱ्याखुऱ्या संघर्षात' जगातील महान संस्कृती, त्यांच्या धर्म, कला, वाङ्मय, तत्त्वज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, नैतिकता व दयार्द्रबुद्धी यांच्यासमवेत एकत्र येतील अथवा परस्परांपासून दूरही राहतील. आजच्या उगवत्या युगात, विविध संस्कृतींचा परस्परसंघर्ष हाच जागतिक शांततेला सर्वात मोठा धोका ठरेल; हे जेवढे खरे आहे तेवढेच हेही खरे आहे की, संस्कृती-संस्कृतींच्या पायांवर उभारलेली आंतरराष्ट्रीय व्यवस्था हाच जागतिक युद्धातून जगाला तारून नेणारा खात्रीलायक उपाय आहे.

*(सॅम्युअल हन्टिंग्टन, 'द क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स अँड द रिमेकिंग ऑफ वर्ल्ड ऑर्डर')*

संस्कृती

# संस्कृतींमध्ये संघर्ष की समन्वय ?

जागतिक इतिहासात भिन्न-भिन्न संस्कृतींनी स्वतःचे एक वेगळे स्थान मिळविले आहे. किंबहुना भिन्नभिन्न संस्कृतींचा इतिहास हाच जगाचा इतिहास आहे, असे म्हटले तरी ते अयोग्य ठरणार नाही. मनुष्य जीवनातील संस्कृतींचे महत्त्व लक्षात घेऊन या विषयावर अनेक तज्ज्ञांचे साहित्य प्रसिद्ध झालेले आहे. असेच एक महत्त्वपूर्ण पुस्तक लिहिले आहे हार्वर्ड मधील प्रोफेसर सॅम्युअल हन्टिंग्टन यांनी. १९९३ मध्ये 'द क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स' या शीर्षकाखाली लिहिलेल्या त्यांच्या लेखाने अमेरिकेसह काही देशांमध्ये वैचारिक वादळ निर्माण केले. त्यानंतर आणखी अभ्यास करून त्यांनी याच नावाचे पुस्तक १९९६ मध्ये प्रसिद्ध केले. अमेरिकेतील 'वर्ल्ड ट्रेड सेंटर' व 'पेन्टॅगॉन'वर इस्लामी दहशतवाद्यांचा हल्ला झाल्यापासून हे पुस्तक पुन्हा एकदा प्रसिद्धीच्या झोतात आले आहे. 'अर्थबोधपत्रिके'च्या 'नवे भूभागीय राजकारण' या लेखात (अंक क्रमांक ६, नोव्हेंबर १९९९, पृष्ठ क्र १० ) या पुस्तकाचा उल्लेख केला आहे. अलीकडे 'इकॉनॉमिक टाइम्स' (१९ सप्टेंबर २००१) 'हिंदू' (१९ सप्टेंबर २००१) 'टाइम्स ऑफ इंडिया' (२२ सप्टेंबर २००१) या दैनिकांमधील लेखांतही या पुस्तकाचा उल्लेख करण्यात आला.

या पुस्तकात नेमके आहे तरी काय ? आणि सध्याच्या जागतिक घडामोडींमध्ये त्याचा संदर्भ कोणता ?

संस्कृतीची व्याख्या, इतिहास, समाजजीवनावर संस्कृतीचा होणारा परिणाम, भिन्न विचारसरणीतून (म्हणजे एकप्रकारे संस्कृतीमुळेच) इतिहासात झालेली युद्धे व त्यांचा संस्कृतीशी असलेला संबंध, काळानुरूप संस्कृतींना मिळालेले महत्त्व, विविध संस्कृतींमधील होत असलेले व होऊ शकणारे संघर्ष आणि संस्कृतींचे भवितव्य अशा अनेक परस्परसंबंधी घटनांचा वेध घेण्याचा प्रयत्न या पुस्तकात लेखकाने केला आहे. लेखकाच्या मते हा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून करण्यात आलेला नसून, शीतयुद्धानंतरच्या काळातील जागतिक राजकारणाच्या प्रगतीचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे या पुस्तकात इतिहासकालीन घडामोडींपासून देशादेशांमधील लष्करी सामर्थ्यापर्यंत अनेक बाबींचा विचार करण्यात आला आहे.

या पुस्तकात हंटिंग्टन यांनी एखादी विशिष्ट संस्कृती नष्ट होईल वा टिकेल असे काही म्हटलेले नाही. तसेच हिंदू संस्कृतीबद्दलही फारसे विवेचन केलेले नाही. मात्र भारताचा व हिंदू संस्कृतीचा उल्लेख त्यांनी केला आहे. या पुस्तकातील काही विचारांचे संकलन या लेखात केले आहे.

**संस्कृतीआधारित विभागणी**

आंतरराष्ट्रीय संबंधांचा विचार करताना राजकीय व आर्थिक बाजू चटकन विचारात घेतली जाते, आणि सांस्कृतिक बाजू मात्र बहुतेकवेळा दुर्लक्षिली जाते. वस्तुस्थिती अशी आहे की, शीतयुद्धानंतरच्या काळात दोन महासत्तांमधील वाद मागे पडून, त्याची जागा सांस्कृतिक संघर्षाने घेतली आहे. त्यामुळे जगातील प्रमुख राष्ट्रांची, काही प्रमाणात संस्कृतीवर आधारित विभागणी होत असताना दिसते. यात छोटी राष्ट्रेही महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. साधारणपणे ही सांस्कृतिक विभागणी पुढीलप्रमाणे होते आहे, असे आढळते.

(१) अमेरिकेच्या नेतृत्वाखाली युरोपीय व पश्चिमेकडील इतर काही राष्ट्रांचा एक गट, यालाच सांस्कृतिक साधर्म्यामुळे 'वेस्ट' असे म्हटले जाते. (२) जुन्या साम्यवादी राष्ट्रांचा उदाहरणार्थ -रशिया, 'ऑर्थोडॉक्स' गट. (३) चीन, जपान सारख्या राष्ट्रांचा 'सिनिक' गट. (४) मुस्लिम राष्ट्रांचा गट

आर्थिक ताकदीमुळे पश्चिमेकडील राष्ट्रांची वाढती शिरजोरी, मुस्लिम राष्ट्रांमध्ये वाढत असलेला मूलतत्ववाद व त्यामुळे त्यांचा इतरांना वाढता विरोध, चीन, जपानसारख्या राष्ट्रांची मोठ्या प्रमाणावर वाढलेली लष्करी व आर्थिक शक्ती आणि त्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेली तीव्र अस्मिता, यांमुळे जगात सांस्कृतिक विभागणी होण्याला खतपाणी मिळते आहे. जागतिकीकरणाच्या माध्यमातून जगभर एकच व्यापारी संस्कृती प्रस्थापित करण्याबाबत 'पश्चिमे'कडून होणारे प्रयत्न, त्याला विरोध करण्यासाठी आपापली संस्कृती पुढे आणण्याचे व अस्मिता टिकविण्याचे इतर राष्ट्रांचे प्रयत्न, यातूनही सांस्कृतिक विभागणीच पुढे येताना दिसते. पश्चिमेकडील राष्ट्रांना वाटते की, आपण जगातील सर्व राष्ट्रांच्या भल्यासाठी (?) जे समानीकरणाचे धोरण स्वीकारण्यावर भर देतो, तेच योग्य करतो आहोत. दुसरीकडे 'हेच धोरण', इतर राष्ट्रांसाठी 'साम्राज्यवादी धोरण' ठरत असते, आणि या साम्राज्यवादाला कडाडून विरोध करण्यासाठी आपापल्या संस्कृतीचा आधार घेतला जातो. यातून संघर्षाच्या शक्यता वाढतात.

**संस्कृतींमध्ये संघर्ष ?**

एकमेकांवर कोणत्या ना कोणत्या प्रकारे वर्चस्व गाजविण्याची वृत्ती ही

बहुतांशवेळा संघर्षाला कारणीभूत ठरत असते. इतिहासकालीन युद्धांपासून विसाव्या शतकाअखेरीच्या युद्धांची पार्श्वभूमी फारशी वेगळी आढळत नाही. साधारणपणे लष्करी शक्ती वाढविण्यासाठी व व्यापारात आघाडी मिळविण्यासाठी प्रयत्न, आपले साम्राज्य वाढविण्यासाठी दुसऱ्या संस्कृतींवर विविध मार्गांनी आघात करण्याचे प्रयत्न, 'आम्ही' विरूद्ध 'ते' ही प्रखर भावना, अशा कारणांची मालिकाच या संघर्षामागेच असते. अशा सर्व संघर्षांचा अभ्यास करताना सॅम्युअल हन्टिंग्टन यांनी 'वेस्ट विरुद्ध रेस्ट' आणि 'इस्लाम अँड द वेस्ट' या शीर्षकांतर्गत काही विवेचन केले आहे.

इस्लामच्या समर्थकांनी अमेरिकेवर केलेला हल्ला ही इस्लामसाठी 'सांस्कृतिक लढाई ' आहे, असे इस्लामी नेत्यांच्या वक्तव्यावरून लक्षात येते. अमेरिकेने असे काही म्हटलेले नाही, तरी इस्लामी समर्थकांनी 'इस्लाम' विरूद्ध 'अमेरिका म्हणजे वेस्ट' असे या संघर्षाला म्हटले आहेच. त्यामुळेच हंटिंग्टन यांच्या 'द क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन'चा एवढा उल्लेख झाला.

विसाव्या शतकात, दोन महायुद्धांनंतर झालेले छोटे-मोठे संघर्ष या 'सांस्कृतिक संघर्षा'त मोडता येतील, असे हंटिंग्टन यांना वाटते. अशा संघर्षांना ते 'फॉल्ट लाईन वॉर' म्हणतात. यापुढे जागतिक राजकारणात असे काही 'सांस्कृतिक संघर्ष ' अधिक तीव्र होण्याची शक्यता या पुस्तकात व्यक्त करण्यात आली आहे, म्हणून त्यावर मोठी टीकाही झाली आहे. त्यातच जगाचे ध्रुवीकरण कसेकसे होऊ शकते, तेही लेखकाने मांडले आहे. चीन हे आशिया खंडातील एक बलाढ्य राष्ट्र असून 'पश्चिमे'ला आव्हान देण्याची क्षमता या राष्ट्रात निर्माण होऊ शकते. 'पश्चिमे'च्या आधीच विरोधात असलेला मुस्लिम राष्ट्रांचा गट चीनकडे झुकण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच जपान व आशियातील इतर राष्ट्रे (भारत वगळता) चीनच्या विरोधात जाणे टाळू शकतील. अशा परिस्थितीत अमेरिका, युरोप, रशिया व भारत यांच्या विरूद्ध चीन, जपान आणि मुस्लिम राष्ट्रे असे युद्ध होऊ शकेल का ? असा प्रश्न या पुस्तकाने उपस्थित केला आहे.

जागतिक व्यापार संघटनेत येण्यासाठी चीन उत्सुक असून, तेथेही हळूहळू भांडवलशाहीची मूल्ये रुजताहेत, असे दिसत असले तरी चीनने अमेरिकेकडे कायम 'हा देश आपला सर्वात मोठा शत्रू' म्हणूनच पाहिले आहे. तसेच इस्लामी मूलतत्ववाद्यांना चीनचा पाठिंबा आहे, असेही म्हटले जाते. याकडे हंटिंग्टन यांनी लक्ष वेधले आहे. म्हणूनही हे पुस्तक चर्चेच्या प्रवाहात राहिले असावे.

हंटिंग्टन यांची गृहितके चुकीची आहेत असेही म्हटले जाते. हे पुस्तक वादग्रस्त ठरले असले, तरी अखेरच्या प्रकरणात विविध संस्कृतींचे भवितव्य चांगले असावे व त्यांतील संघर्ष टाळला जावा, यासाठी संस्कृतींमधील साधर्म्य व समन्वय यांचा विचार करण्यात आला आहे. तो समजून घेणे इष्ट ठरेल.

**संघर्षाकडून समन्वयाकडे**

संस्कृती ही परंपरेने चालत आलेली असून ती समाजाच्या हाडीमासी खिळलेली असते. प्रत्येक संस्कृती, दुसऱ्या संस्कृतीपेक्षा वेगळी असली तरी मानवी मूल्यांचा विचार करता त्यात कुठे ना कुठे साधर्म्य असतेच. संघर्ष टाळण्यासाठी, पाश्चिमात्यांची ख्रिश्चन संस्कृती, रशियातील परंपरागत संस्कृती, हिंदू संस्कृती, इस्लाम, बौद्ध व कन्फ्युशियानिझम, तसेच ताओइझम व जुडाइझम या सर्वांमधील समानता शोधून एक नवीन 'जागतिक संस्कृती' उदयास यावी लागेल. प्रत्येक संस्कृतीमधील विविध घटकांना यासाठी मनापासून व त्वरित प्रयत्न करावे लागतील. या प्रयत्नांमधून सर्वच संस्कृती आपापल्यापरी बळकट होतील. अर्थात संस्कृतींमध्ये बदलण्याची व नवे आत्मसात करण्याची लवचिकता असावी लागेल. तसेच त्यांना आपल्या संस्कृतीप्रमाणेच दुसऱ्या काही संस्कृतींचे अस्तित्वही मान्य करावे लागणार आहे. आपलीच संस्कृती श्रेष्ठ असे म्हणून इतरांना कमी लेखण्याचा प्रयत्न सोडून द्यावा लागणार आहे. हिंदू संस्कृती कदाचित याकामी पुढाकार घेऊ शकेलही.

याशिवाय सध्या बलाढ्य असलेल्या अमेरिका व चीन सारख्या राष्ट्रांना छोट्या-मोठ्या संघर्षांपासून स्वतःला दूर ठेवावे लागणार आहे. ज्या संस्कृती संघर्षांपासून दूर राहतील त्या चर्चेतून प्रश्न सोडविण्याच्या कामी पुढाकार घेऊ शकतील. राजकीय मार्गाने सर्वच संस्कृतींना एका व्यासपीठावर आणून संघर्ष टाळण्याचा प्रयत्न करण्याचाही मार्ग अवलंबिता येईल. जागतिक शांततेला मोठा धोका संस्कृतींच्या संघर्षाचा आहे. तसेच भविष्यात मध्य आशियातील तेलसाठे (इस्लाम व चीन संबंध समजून घेऊन) कळीचा प्रश्न ठरण्याची शक्यता लक्षात घेऊन, आत्तापासूनच तो योग्यमार्गाने सोडविण्यासाठी संस्कृतींचा समन्वय साधणे गरजेचे आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्था अमेरिका व युरोप यांच्या हितसंबंधांना बाधा येऊ नये यासाठीच कार्य करताना दिसतात. ते बदलून प्रत्येक संस्कृतीचे प्रतिनिधित्व संयुक्त राष्ट्रसंघापासून व्यापारी संघटनांपर्यंत सर्वत्र असावे लागेल.

■■

सामाजिक

# संशोधन : सार्वजनिक निधी व समाजहित

नवनवीन तंत्रज्ञानामुळे संशोधनाच्या क्षेत्राला एक वेगळे वळण मिळाले आहे. खरे म्हणजे सततच्या संशोधनातूनच आजचे नवे तंत्रज्ञान निर्माण झाले आहे, ही देखील वस्तुस्थिती आहे. पण आज या संशोधनाच्या क्षेत्रात एक वेगळाच, आणि ज्याला थोडाफार 'नैतिक' म्हणता येईल असा प्रश्न उद्‌भवला आहे. तो म्हणजे या संशोधनांसाठी लागणाऱ्या निधीचा प्रश्न होय. संशोधन ही अतिशय खर्चिक बाब आहे; तसेच कधीकधी हा खर्च वाया जाण्याचीही शक्यता असते. त्यामुळे संशोधन ही एक प्रकारे श्रीमंत राष्ट्रांचीच मक्तेदारी होऊ पाहत आहे किंवा झाली आहे, असे दिसते. श्रीमंत राष्ट्रांमधील श्रीमंत कंपन्यांनाच हा खर्च करणे शक्य असते. त्यातही बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जाळे जगात अनेक देशांत पसरले असल्याने त्यांना विविध प्रकारे संशोधन करवून घेणे शक्य होते. त्यामुळे अनेक कंपन्या ग्राहकांच्या प्राप्तीसाठी व बाजारपेठेत नवीन उत्पादने आणून, ती खपविण्यासाठी विविध प्रकारचे संशोधन करीत असतात. अर्थात नफा व स्वार्थ या दोन गोष्टी संशोधनात शिरल्या तर, ते संशोधन हे कितपत विश्वासार्ह मानायचे ? असा एक प्रश्न जगापुढे आला आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर हा मुद्दा गेल्या काही दिवसांपूर्वी चर्चिला गेला व मग अशा संशोधनांसाठी एक सार्वजनिक निधी असावा, अशी सूचना पुढे आली. वास्तविक जैवतंत्रज्ञानातील संशोधनांमुळे हा प्रश्न ऐरणीवर आला आहे, जगातील भूकेचा प्रश्न सोडविण्यासाठी फक्त जैवतंत्रज्ञान हाच एकमेव पर्याय आहे, असे अनेक कंपन्यांचे म्हणणे आहे. यासाठी आवश्यक असलेला संशोधनाचा पुरावाही त्यांच्यातर्फे वेळोवेळी देण्यात येतो. पण दुसरीकडे जैवतंत्रज्ञान वापरून तयार केलेले अन्नधान्य व विविध पदार्थ आरोग्याला व निसर्गाला धोकादायक आहे, असे म्हणणारा व काही प्रमाणात पुरावे देणाराही एक वाढता गट आहे. त्यामुळे विविध देशांतील सरकारे व ग्राहक आता अडचणीत आली आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या अन्नाचा व आरोग्याचा प्रश्न सोडविण्याची ताकद फक्त जैवतंत्रज्ञानातच आहे, हा दावा खरा मानायचा की, यामुळे आरोग्य व पर्यावरण आणि नैसर्गिक अन्नसाखळी धोक्यात येते आहे, यावर विश्वास ठेवायचा, या कात्रीत जग सापडले आहे. हे संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांमध्येही दोन गट पडले आहेत, असे आढळते.

यासंदर्भात नुकतीच बँकॉक येथे एक आंतरराष्ट्रीय परिषद झाली. ब्रिटनमधील सरकार व 'ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंट' (ओ.ई.सी.डी.) यांनी संयुक्तरीत्या आयोजित केलेल्या परिषदेत, अशा वादग्रस्त संशोधनांसाठी सार्वजनिक निधी उपलब्ध होण्याची नितांत गरज असल्याचे मत बहुतेक तज्ज्ञांनी व्यक्त केले.

संशोधन हे समाजाने उभ्या केलेल्या निधीतून करावे. ते सार्वजनिक हिताचे ठरेल.तसे झाले तर शास्त्रज्ञांवर कोणताही दबाव राहणार नाही, तसेच संशोधनांतील निष्कर्षांनाही स्वतःची अशी, समाजहिताची दिशा मिळेल, असा सूर या परिषदेत उमटला.

दुसरीकडे जर्मनीतील बॉन येथे 'सस्टेनेबल फूड सिक्युरिटी फॉर ऑल -बाय 2020' या विषयावर झालेल्या परिषदेत, वॉशिंग्टन येथील 'इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिटय़ूट'चे डायरेक्टर जनरल डॉ. पेर पिनस्ट्रूप अँडरसन यांनी देखील शेती व निसर्ग नष्ट न होण्याची काळजी घेऊन, सार्वजनिक निधीतून शेती व अन्नधान्यविषयक संशोधन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. अँडरसन यांना २००१ चा जागतिक पातळीवरील अन्नपुरस्कार नुकताच मिळाला आहे.

सध्याचे शेतीविषयक बहुतेक सर्व संशोधन हे खाजगी संस्थांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीतून होत असते व ते श्रीमंत देशांतील शेतकरीवर्गाच्या गरजा डोळ्यासमोर ठेवून करण्यात आलेले असते. त्यामुळे विकसनशील राष्ट्रांमधील शेतकऱ्यांना या संशोधनाचा तेवढाच उपयोग होईल असे नाही. आता जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रांतील संशोधन पाहता सार्वजनिक निधीतून हे सर्व संशोधन होण्याची गरज प्रकर्षाने जाणवते आहे, असे मत डॉ. अँडरसन यांनी व्यक्त केले आहे. जगातील कोट्यवधी नागरिकांना पुरेसे अन्न मिळत नाही व लाखो-करोडोंना पोषक अन्न म्हणजे काय याची कल्पनाच नसते, मग ते त्यांच्यापर्यंत पोचणे दूरच राहिले. अशा परिस्थितीत जागतिकीकरणाचा व नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेऊन भूकेचा प्रश्न प्राधान्याने सोडविला पाहिजे. भारतासारख्या देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा असूनही लाखो लोक उपाशी राहतात कारण अन्नधान्य विकत घेण्याची त्यांची क्षमताच नसते. ही परिस्थिती त्वरित बदलून गरिबांचे उत्पन्न वाढण्याच्या योजना त्वरेने कार्यान्वित होण्याची गरज आहे. जमिनीचे, पर्यावरणाचे नुकसान न करता सर्वांना पोषक व पुरेसे अन्न उपलब्ध करून देण्याचे आव्हान सध्या जगासमोर आहे. असे त्यांचे स्पष्ट मत आहे. ■■

*(संदर्भ - 'डाऊन टू अर्थ', 'हिंदू', 'इकॉनॉमिक टाइम्स')*

# औषधांची चाचणी व त्यातील नैतिकता

फायझर ही अमेरिकन बहुराष्ट्रीय औषधी कंपनी आपल्या ओळखीची आहे. या कंपनीच्या गुन्हेगारी स्वरूपाच्या अनैतिक कृत्याची चौकशी अमेरिकेच्या फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशनने सुरू केली आहे. गेल्या वर्षी अमेरिकेतील वॉशिंग्टन पोस्ट या मासिकाने, फायझर कंपनीच्या या गुन्ह्याला वाचा फोडली. अमेरिकेतून फार मोठ्या प्रमाणावर नवनवीन औषधांचे प्रयोग करून पाहण्याचे शोधकार्य, अमेरिकेबाहेर, प्रामुख्याने विकसनशील राष्ट्रांकडे निर्यात केले जात आहे. हे प्रयोग गुप्तपणे, तेथील शासनाला अंधारात ठेवून आणि लोकांना कळू न देता केले जातात. कारण ज्यांच्यावर प्रयोग केले जातात त्या निरपराध व्यक्तींना ते धोकादायक ठरण्याचाही संभव असतो.

नायजेरियात असेच घडले आहे. नायजेरियात १९९६ साली मेनिंजायटिसची मोठी साथ पसरली होती. त्यावेळी फायझर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आपण तयार केलेल्या ट्रोवान या औषधाची परीक्षा करण्याचा प्रयोग घाईघाईने आखला. आरोग्यशिबिरात दाखल झालेल्या १०० मुलांवर त्यांनी ट्रोवानचे प्रयोग केले. त्यातील काही मुले तर अगदी दोन -चार महिन्यांची होती. आणि आणखी १०० मुलांना ट्रोवानऐवजी उपलब्ध असलेले पर्यायी औषध दिले. ज्या मुलांना ट्रोवानचे डोस दिले, त्या मुलांपैकी ११ मुले दगावली. इतर काही मुलांना बहिरेपण, अवयव लुळे पडणे, मेंदूचे विकार, पक्षाघात असे कायमस्वरूपी अपंगत्व प्राप्त झले.

अर्थात फायझर कंपनीचे म्हणणे असे की, या मृत्यूंचा किंवा निर्माण झालेल्या आजारांचा ट्रोवान औषधाच्या प्रयोगांशी काहीही संबंध नाही, उलट, हा केलेला प्रयोग अतिशय सावधगिरी बाळगून केलेला होता व त्यामुळे काहीजणांचे जीव वाचले आहेत. तसेच हे प्रयोग नायजेरियातील सरकारच्या संबंधित प्रशासनाच्या मान्यतेने केले होते व त्यासाठी मुलांच्या पालकांची परवानगीही घेतली होती. मात्र फायझरच्या वतीने या प्रयोगात भाग घेतलेल्या डॉक्टरने सांगितले की, अशा प्रयोगांसाठी लागणारे संशोधनाच्या नैतिकतेचे प्रमाणपत्र, प्रयोगानंतर एक वर्षाने तयार करण्यात आले आणि, त्यांवर आधीची तारीख घालण्यात आली. मुलांसाठी या ट्रोवान औषधांच्या विक्रीवर खुद्द

**(पान क्रमांक २८वर)**

# जागतिक भांडवलबाजार : भारताचे स्थान

भारताला परदेशी भांडवलाची गरज नेहमी भासते. कारण, भारतातील बचतीचा वेग जरी समाधानकारक असला तरी, गुंतवणूकीचे प्रमाण त्याहून जास्त असते. गेल्या काही वर्षांत बचतीचा वेग सुमारे २२ टक्के इतका आढळतो. भारताची निर्यात तशी दिवसेंदिवस वाढतेच आहे. १९९९-२००० या वर्षी ती ३८ अब्ज डॉलर्स इतकी होती. पण भारतात आयातीचे प्रमाण त्याहून जास्त असते, आणि तेही दिवसेंदिवस वाढताना आढळते. भारताने परदेशी कर्जे काढलेली आहेत. मार्च २००० अखेरीस एकूण कर्ज ९८ अब्ज डॉलर्स इतके होते. त्यावरील व्याज व परतफेड करण्याकरिता परदेशी चलनाची आवश्यकता भासते. बचतीचा वेग कितीही वाढला तरी भारताला परदेशी चलनातली कर्जे आणि भांडवल लागणारच, हे निश्चित.

सर्वसाधारणपणे १९८०-८१ पर्यंत भारत आपली सर्व गरज आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था यांच्याकडून कर्जे काढून आणि 'भारत सहाय्य निधी'तर्फे देणग्या व कर्जे मिळवून भागवीत असे. पण त्या सुमारास, भारताच्या वाढत्या गरजा भागविण्याकरिता जागतिक भांडवलबाजारात उतरून आपली गरज भागवावी असा विचार पुढे आला. शिवाय जागतिक वित्तसंस्था काही सदासर्वदा आपल्याला कर्जे देतील याची शाश्वती नव्हती. केव्हातरी आपल्या पायावर भांडवलबाजारात उभे राहणे आवश्यक होते. त्यानुसार भारत सरकारने आपले धोरण बदलले आणि भारतीय कंपन्या, बँका आणि वित्तसंस्था यांना जागतिक भांडवलबाजारामार्फत कर्जे उभारण्याची परवानगी मिळू लागली.

१९८० ते १९९० या दशकात भारताला त्या संदर्भात अतिशय उत्तम अनुभव आला. बँकांकडून कर्ज काढून किंवा भांडवल बाजारात रोखे विक्रिला काढून हवे तेवढे परदेशी चलन मिळविणे शक्य झाले. आंतरराष्ट्रीय बँका किंवा मर्चन्ट बँका भारतीयांना कर्जे द्यायला तयार असत. भारताची बाजारातील पत उत्तम होती आणि भारत सरकारने त्याकाळात ही बाब अत्यंत चोख रीतीने हाताळली, असे म्हणता येईल. या दशकात एकूण रक्कम जरी माफक प्रमाणात बाजारयंत्रणेमार्फत उभी केली असली तरी, भारताने त्या यंत्रणेतील आपले स्थान पक्के केले हे विशेष होय. १९९१ मध्ये सुरूवातीला भारताची आर्थिक स्थिती अतिशय हलाखीची अशी होती. परकीय चलनातील गंगाजळी

संपुष्टात आल्याने, काही काळ तरी सोने विकून / गहाण टाकून आपली पत टिकविण्याची पाळी भारतावर आली. साहजिकच भारताची बाजारातील पत कमी झाली आणि बँकांकडून कर्जे मिळणे बंद झाले. 'गुंतवणूकीला अयोग्य' (non-investment grade) असा शिक्का भारतावर मारला गेला. त्याचे दुष्परिणाम भारताला भोगावे लागले.

नव्वदीच्या मध्यावर भारताची आर्थिक परिस्थिती खूपच सुधारली. निर्यातीत वाढ, किंमत वाढीचा माफक वेग, औद्योगिक उत्पादन वाढलेले आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे आर्थिक विकासाचा वाढलेला वेग (सुमारे ७ टक्के) इत्यादी गोष्टींमुळे भारताची पत वाढली. आणि एकूणच मुक्त अर्थव्यवस्था राबविण्याच्या धोरणांमळे, भारत सरकारने जागतिक भांडवलबाजारातून शक्य त्या सर्व मार्गांनी भांडवल उभे करण्याचे धोरण आखले. कर्जे काढणे, भागभांडवल (ग्लोबल डिपॉझिटरी रिसीट्स - जीडीआर स्वरूपाचे) उभारणे, प्रत्यक्ष परदेशी भांडवल गुंतवणुकीकरिता प्रयत्न करणे, विदेशी वित्तसंस्थांना भारतीय शेअरबाजारात व्यवहार करायला मुभा देणे इत्यादी ते मार्ग होत. या सर्व मार्गांनी परदेशी चलन बाजारयंत्रणेमार्फत आल्याने, भारताची बरीच गरज भागली जाऊ लागली. आणि सरकारने मग 'भारत सहाय्य निधी'चे रूपांतर 'भारत विकास मंचा'त करण्याकरीता यशस्वी प्रयत्न केले.

**परदेशी भांडवल उभारणी : प्रमुख समस्या**

नव्या शतकाच्या सुरूवातीला भारताची आर्थिक परिस्थिती पाहिल्यास, परदेशी भांडवल उभारणी आवश्यक बनली आहे, असे दिसते. भारताला तीन प्रमुख मार्ग त्याकरिता उपलब्ध आहेत. (१) भारत विकास मंचातर्फे उपलब्ध होणारे भांडवल (२) भांडवल बाजारात कर्जे उभारणी / भागभांडवल विक्री, आणि (३) परदेशी भांडवल गुंतवणूक - प्रत्यक्ष आणि शेअरबाजारातली अप्रत्यक्ष अशी. या तीनही मार्गांचा अवलंब करणे भारताला क्रमप्राप्त आहे, कारण भारताची गरज तशी थोडीथोडकी नाही. म्हणूनच आजमितीला त्यासंबंधी पूर्ण विचाराअंती धोरण निश्चित करावे लागेल.

वर नमूद केलेल्या तीन मार्गांपैकी, पहिला मार्ग तसा सोयीचा असे म्हणता येईल. एक तर गेली कित्येक वर्षे भारताला जुन्या 'भारत सहाय्य निधी' अथवा आताच्या 'भारत विकास मंच' या यंत्रणेमार्फत पैसे मिळताहेत. तो मार्ग परिचित आहे. त्या मार्गाने मिळालेल्या रकमेपैकी बरीच रक्कम कमी व्याजाने मिळते, कर्जे दीर्घ मुदतीची असतात आणि भारताला त्या अटीवर मिळणारी कर्जे जास्त

फायद्याची ठरू शकतात. पण हेही लक्षात ठेवले पाहिजे की, त्या मंचातील वित्तसंस्था अथवा विकसित देश कर्जे देताना अटी घालतात. त्या जाचक ठरू शकतात. भारतात त्याबद्दल ओरड होत राहते, आणि तो पैसा वापरताना भारताला स्वातंत्र्य नसते. जसजशी भारताची बाजारभावाने व्याज देण्याची तयारी वाढत जाईल, तसतशी त्यावरील भिस्त कमी करून इतर मार्गांचा अवलंब करावा, असे या संदर्भात सुचवावेसे वाटते.

दुसरा मार्ग म्हणजे जागतिक भांडवलबाजारातून कर्जे काढायचा, अथवा भागभांडवल उभे करण्याचा होय. त्या यंत्रणेमार्फत भांडवल उभे करण्याकरिता खूप तयारी असावी लागते. बाजारयंत्रणेचा अभ्यास करून तिथल्या घडामोडींचा मतितार्थ समजावून घ्यावा लागतो. खुल्या बाजारयंत्रणेत व्याजदरात चढउतार होत राहतात. ते आपल्याला नेहमीच परवडतील असे नाही. कर्जे काढणे अथवा भागभांडवल उभे करणे याकरिता करार करावे लागतात. ते करार परदेशी कायदेकानूंप्रमाणे तयार केले जातात, त्यांची जाणकारी असावी लागते. या मार्गाने येणारा पैसा वापरण्यावर तशी खास बंधने नसतात, पण ते स्वातंत्र्य मिळविण्याकरिता जास्त किंमत मोजावी लागते. भारताची गरज लक्षात घेता, हाही मार्ग भारतीय कंपन्यांना अवलंबावा लागेल. परदेशी बाजारपेठेत आपली पत सिद्ध करावी लागेल, टिकवावी लागेल. परदेशी बाजारयंत्रणेतील धनको संस्था आणि गुंतवणूकदार यांना दिलासा मिळेल, हेही पाहावे लागेल.

भांडवल उभारणीचा तिसरा मार्ग तसा सर्वात उत्तम असा म्हणता येईल. त्यांत दोन पर्याय आहेत. पहिला पर्याय म्हणजे परदेशी वित्तसंस्थांना भारतीय शेअरबाजारात व्यवहार करण्याकरिता मुभा देण्याचा. (portfolio investment) या मार्गाने मोठ्या प्रमाणावर पैसा भारतात येऊ शकतो. पण शेअरबाजार गडगडल्यास तो पैसा बाहेर जाऊ शकतो. त्यामुळे त्या मार्गाने येणाऱ्या भांडवलातून दीर्घ मुदतीचे प्रकल्प हाती घेता येत नाहीत. तसा तो भरवशाचा नाही. तरीदेखील त्यामार्गाने येणारे परकी चलन मिळविणे क्रमप्राप्त आहे, असे म्हणता येईल. भारताला आजमितीला तरी सर्व मार्ग शोधावे लागतील.

शेअरबाजारातील गुंतवणुकीच्या मार्गाने येणाऱ्या भांडवलापेक्षा 'प्रत्यक्ष परकी गुंतवणूक' ( Foreign Direct Investment - FDI) अधिक चांगली हे सर्वश्रुत आहे. हा मार्ग चांगला आहे कारण, परदेशी गुंतवणूकदार आपला पैसा भारतातील उद्योगात गुंतवतात आणि असे उद्योग भरभराटीला आले तर, त्यांना त्यावर चांगला परतावा मिळतो. म्हणूनच परदेशी गुंतवणूकदारांचे हितसंबंध

निर्माण करणारा हा मार्ग उत्तम. शिवाय त्यांची गुंतवणूक देशी चलनात (भारतीय रुपयात) मोजली जाते, ते भारताच्या फायद्याचे असते.

परदेशी भांडवल उभे करण्याकरिता, भारताला तसे निश्चित धोरण आखावे लागेल. त्यात प्रमुख बाब म्हणजे या तीनही मार्गांचा अवलंब करताना ह्यात समतोल असावा लागेल. आपली व्याज देण्याची ऐपत, आपल्यावर लादल्या जाणाऱ्या अटी, भांडवलबाजारात व्यवहार करण्याची आपली तयारी आणि त्याकरिता लागणारी जाणकारी, इत्यादी गोष्टी पाहून योग्य असे 'मिश्रण' (optimal mix) करावे लागेल. तसे एकदा मिश्रण निश्चित झाल्यावर आणखी व्यावहारिक बाजू पाहाव्या लागतात. परकीय चलनाची निवड, परकीय बाजारापेठेची निवड, पैसा उभा करण्याकरिता उपलब्ध असलेल्या मार्गाची निवड, इत्यादी. त्या व्यावहारिक बाबी होत. त्यांची निवड झाल्यास, परदेशी चलनातली आपणाला परवडणारी वैविध्यता साध्य होऊ शकते. (resource diversification)

जागतिक भांडवलबाजारयंत्रणा तशी गुंतागुंतीची, अतिशय गतिशील, तरीदेखील सोयीची असते. ती गुंतागुंत सोडविण्याकरिता 'जोखीम व्यवस्थापन' आवश्यक असते. त्याकरिता उपाययोजना अस्तित्वात आहेतच. भारताला जर यापुढेही परदेशी चलन लागणारच असेल तर, भारतीय वित्तव्यवस्थापकांनी पूर्ण तयारीनिशी ती बाजारयंत्रणा सांभाळली पाहिजे. तसे व्यवहार चोख हाताळल्यास भारताला पैशाची बचत होऊन, जोखीम व्यवस्थापन होऊन, आपले ईप्सित साध्य करता येईल. त्याकरिता गरज आहे पुरोगामी विचारसरणीची आणि आत्मविश्वासाची ! ■■

*(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे भारताचे जागतिक भांडवलबाजारातील स्थान : प्रगती व स्थान या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी या विषयातील तज्ज्ञ डॉ. प्र.र. जोशी यांचे बीजभाषण झाले. त्याचा हा गोषवारा )*

---

*(पान क्रमांक २४ वरून )*

अमेरिकेत मात्र बंदीच आहे. प्रौढांसाठी जेव्हा याची विक्री व वापर सुरू झाला, तेव्हाही त्याचा परिणाम लिव्हर बंद पडण्यात होतो, असे लक्षात आल्याने त्याच्या वापरावर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. युरोपियन युनियनने तर ट्रोवानवर पूर्णत बंदी घातली आहे. आता अमेरिकेत वकिलांच्या एका गटाने, तीस नायजेरियन कुटुंबांच्या वतीने फायझर कंपनीवर खटला दाखल केला आहे. नायजेरियामध्येही असाच खटला दाखल करण्यात आला आहे. ■■

जगाच्या पाठीवर.....

## बदलते स्त्री विश्व

दिवसेंदिवस स्त्रिया आपापल्या संकुचित विश्वांतून बाहेर पडताहेत. त्यांचे कार्यक्षेत्र व्यापक बनत चालले आहे. मात्र त्याला सुसंगत ठरतील असे बदल मात्र, तेवढ्याच वेगाने, समाजात घडून येताना दिसत नाहीत. त्यामुळे स्त्रियांची मानसिक कुतरओढ होण्याचीच शक्यता अधिक आहे. गेल्या काही वर्षांपासूनच स्त्रियांची अशी कोंडी होत आहे. वेगवेगळ्या देशांत ही कोंडी फोडण्याचे प्रयत्नही होत आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक प्रसारमाध्यमे या विषयात लक्ष घालीत आहेत. मोजक्या देशांमधील व्यापक स्त्री विश्वातील, काही घडामोडींचे हे संकलन.

**जपान** - जपानचे नाव वाचताच, पूर्व आशियातील औद्योगिकदृष्ट्या अतिशय प्रगत व समृद्ध देश असे चित्र कळत नकळत आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. जपान हा संस्कृतीप्रिय व शांतताप्रिय देश आहे. विनाशकारी अणुयुद्ध अनुभवलेल्या व जगाच्या नकाशावर टिचभर स्थान असलेल्या या देशाने केलेली प्रगती आश्चर्यकारक आहे. या पार्श्वभूमीवर जपानी स्त्रियांची स्थिती कशी आहे? भारताप्रमाणेच जपानच्या संस्कृतीने कुटुंबव्यवस्थेला महत्त्व दिले आहे. त्यामुळे मुले व घर सांभाळणे हेच स्त्रियांचे प्राथमिक कर्तव्य आहे, असे पूर्वीपासून समजले गेले. स्त्रीचे स्थान पुरूषांच्या तुलनेत दुय्यमच आहे, अशी तेथील पुरूषांची धारणा तेव्हाही होती व आजही बऱ्याच प्रमाणात आहे. अशा परिस्थितीत जपानी स्त्री ज्ञानार्जनासाठी व अर्थाजनासाठी घराबाहेर पडली; त्यामुळे करियर करताना अडचणी येणारच हे तिला ठाऊक होते. नोकऱ्यांमध्ये प्रथम पुरूषांना संधी देण्याची प्रवृत्ती येथे आहे, कारण पुरूषांवर अर्थाजनाची जबाबदारी असते, हे येथे गृहीत धरले जाते. आता हळूहळू हे चित्र बदलले असून सर्व क्षेत्रांतील एकूण कामगारांच्या संख्येत सुमारे ४० टक्के स्त्रिया आहेत.

पण जपानमधील सुशिक्षित स्त्रियांचा एक वेगळा प्रश्न नुकताच पुढे आला आहे. तो असा की, विज्ञान व विविध प्रकारचे संशोधनकार्य करणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या फारच कमी आहे. आणि असे कार्य करण्याची इच्छा असणाऱ्या स्त्रियांना इतक्या अनंत अडचणींचा, मानसिक छळाचा सामना करावा लागतो की, नको ते संशोधन, असे तिला वाटू लागते. जपानमधील

व्यवस्थेत, पटापट तक्रारी करणेही स्त्रियांसाठी सोपे नाही. समूहाचे हित जपण्याला तेथे प्राधान्य देण्यात येते. त्यामुळे अशा संशोधक पदांवर आधीच अल्पसंख्येत असणाऱ्या स्त्रीने जर तक्रार केली तर ती स्वार्थी आहे, समूहाचे हित तिच्यासाठी महत्त्वाचे नाही, असा गैरसमज केला जातो व यातून तिचे सर्वप्रकारचे नुकसान जास्त होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे तक्रार करण्यास कोणतीही महिला धजावत नाही.

संशोधकपदावर निवड होणे हेच मुळात स्त्रियांसाठी एक मोठे आव्हान असते. बरेचदा त्यांना पुरूष सहकाऱ्यांपेक्षा कमी वेतन दिले जाते. कामात झालेली कोणतीही छोटी चूक त्यांना महागात पडू शकते. व कामापेक्षा कुटुंबाकडे लक्ष दिल्याने ही चूक झाली, असे मानले जाते. संशोधनात महत्त्वाचे काम केल्यानंतरही ते रिसर्च पेपर्स त्यांच्या नावाने प्रसिद्ध होतीलच याची खात्री नसते. म्हणजे लेखक म्हणून आधी पुरूषाचे नाव प्रसिद्ध होईल याची वरिष्ठांकडून बहुतांशवेळा काळजी घेतली जाते. शिवाय जपानच्या संस्कृतीत कार्यालयीन कामकाजानंतर सर्व सहकाऱ्यांनी एकत्र येऊन थोडेसे मद्यपान करणे हा एक शिष्टाचार आहे. यात स्त्री सहकारी चालत नाही. त्यामुळे दैनंदिन कामकाजात एखाद्या व्यक्तीचा 'संध्याकाळचा मित्र' असणे हे अनेकदा उपयोगी असते, पण ही संधी स्त्रियांना मिळत नाही. लग्नानंतर विवाहित स्त्रीला तर संशोधनाची संधीच मिळत नाही. एकंदरीत जपानमध्ये स्त्रियांना बहुतांश क्षेत्रात लिंगभेदाला सामोरे जावे लागते. नव्या शतकात ही परिस्थिती बदलेल अशी काहींना आशा आहे.

**अमेरिका** - स्त्री-पुरूष समानतेचे तत्त्व अमेरिकेने बऱ्याच प्रमाणात आचरणात आणले आहे. अमेरिकेला सर्दी झाली की, इतर राष्ट्रांना शिंका येतात, असे म्हटले जाते. यातील गंमतीचा भाग सोडला तरी, अमेरिकेच्या जगातील स्थानाबद्दल लिहिण्याची गरज नाही. पण, समानतेचा पुरस्कार करणाऱ्या याच अमेरिकेतील स्त्रियांना मिळकतीतील म्हणजे पगारातील असमानतेच्या या प्रश्नाला तोंड द्यावे लागत आहे. स्त्रियांच्या प्रश्नांसंदर्भात अमेरिकेत बऱ्याच चळवळी उभ्या राहिल्या होत्या. त्यातच वेतनातील समानता हा एक मुद्दा होता. पण या अशा चळवळी होऊन दशके उलटली तरी प्रश्न मात्र कायम आहे.

अमेरिकेतील पुरूष जर एक डॉलर मिळवित असेल असे गृहित धरले, तर अशा प्रत्येक डॉलरमागे स्त्री फक्त ७९ सेंट्स मिळविते, अशी आकडेवारी नुकतीच पुढे आली आहे. यासाठी केलेल्या अभ्यासात सुमारे ६५ विविध

प्रकाराच्या नोकऱ्यांमधील स्त्री-पुरूषांच्या वेतनात असमानता असल्याचे आढळले. यात आठवड्याला २८ डॉलर मिळविणाऱ्या गटापासून आठवड्याला ३२३ डॉलर मिळविणाऱ्या गटाचा समावेश होता. पण यावर टीकाकारांचे म्हणणे असे आहे की, ज्या स्त्रियांच्या नोकरीत काही ना काही कारणाने खंड पडला होता किंवा ज्यांनी मातृत्वरजा फार वाढवून घेतली होती, अशा स्त्रियांनाच वेतनातील असमानतेच्या प्रश्नाला सामोरे जावे लागते. अन्यथा २१ ते ३५ या वयोगटातील स्त्री-पुरूषांमध्ये वेतनात असमानता नाही. आणि याच वयोगटातील अपत्यहीन स्त्रियांमध्ये वेतनातील असमानता ३ टक्केच आहे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

'ब्युरो ऑफ लेबर स्टॅटिस्टिक्स'च्या म्हणण्याप्रमाणे, टीकाकारांचा हा मुद्दा योग्य नाही. कारण कार्यालयीन सुट्ट्यांव्यतिरिक्त एका आठवड्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रजा घेणाऱ्या महिलांचे प्रमाण फारतर ५.१ टक्के एवढेच आहे. आणि साधारणपणे कोणताही पुरूष कर्मचारी देखील एवढीच रजा घेतो. इंटरनेटच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांना देखील पुरूषांच्या तुलनेत प्रतिवर्षी दहाहजार डॉलर कमी वेतन मिळते असे आढळले आहे. पण या क्षेत्रातील आवश्यक कौशल्य व नवे बदल स्त्रियांनी आत्मसात केले नाहीत म्हणून ही असमानता आहे, असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. हे सर्व वादविवाद असले तरी अमेरिकेत वेतनात असमानता आढळतेच, असे स्त्रीवाद्यांचे मत आहे.

**जर्मनी** – युरोपीय देशांमधील प्रगत समजल्या जाणाऱ्या जर्मनीतही नोकऱ्यांमध्ये व विशेषत: विज्ञानाच्या क्षेत्रात संशोधकपदी काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये स्त्रियांचे प्रमाण बरेच कमी आहे. जर्मनीत संशोधकपदावर व त्यातही उच्च पदावर काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण फक्त ५ टक्के आहे. तर हेच प्रमाण फ्रान्समध्ये १४ टक्के व इटलीमध्ये ११ टक्के आहे. त्यामुळे जर्मनीने सरकारी नोकऱ्यांमध्ये व विज्ञानाच्या क्षेत्रात संशोधनासाठी स्त्रियांना काही टक्के जागा (quota) देण्याचा विचार केला आहे. २००५पर्यंत हे प्रमाण ५ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत नेण्याचा तेथील सरकारचा विचार आहे. लिंगभेदावर आधारित असलेली असमानता दूर व्हावी, असे जर्मनीतील अनेक मान्यवरांचे मत असले तरी त्यासाठी या मार्गाचा कितपत उपयोग होईल, याबद्दल ते साशंक आहेत. त्यामुळे या मान्यवरांमध्येच आता दोन गट पडले आहेत. यात गुणवत्तेला व दर्जाला प्राधान्य असले पाहिजे, असेही म्हटले गेले आहे.

**मुस्लिम देश** - जगातील इतर अनेक देशांच्या तुलनेत मुस्लिम देशांतील स्त्रियांचे प्रश्न वेगळ्या स्वरूपाचे आहेत. अर्थात त्यांचे अनेक प्रश्न धर्माशी संबंधित आहेत, पण येथे ती धार्मिकता दूर ठेवून मुस्लिम महिलांकडे बघण्याचा प्रयत्न केला आहे. या महिलांसमोर एक मोठा प्रश्न आहे तो म्हणजे समाजात मिसळण्याचा किंवा मोकळेपणाने वावरण्याचा. काही देशांमधील एखादा छोटा गट वगळता, बहुसंख्य स्त्रियांचे काम पडद्याआडून चालू असते. त्यामुळे समाजाच्या प्रवाहापासून त्या कायम तुटल्यासारख्या असतात. अशा काही सुशिक्षित मुली व स्त्रिया आता इंटरनेटच्या माध्यमातून इतर जगाशी संपर्क ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. मुस्लिम स्त्रियांच्या संदर्भात सुमारे एक लाख वेबसाईट्स आहेत, यावरून ही कल्पना येईल.

**स्पेन** - 'स्त्रियांचा एक पाय मोडून त्यांना कायम घरीच ठेवा' असे स्पेनमधे आजही सार्वजनिक ठिकाणी लिहिलेले आढळते, यावरून तेथील स्त्रियांच्या परिस्थितीची कल्पना यावी. नवऱ्यांकडून होणारी मारहाण हा येथील स्त्रियांपुढचा एक मोठा प्रश्न आहे. स्त्रियांवरील अत्याचाराच्या किमान बावीसहजार घटनांची नोंद गेल्यावर्षी करण्यात आली. १९७५ मध्ये स्पेनमध्ये लोकशाहीची सुरूवात झाल्यानंतर स्त्रियांचे विश्व बदलले. समाजात कायम दुय्यम स्थानावर असणाऱ्या स्त्रिया आता मात्र आपल्यावरील अत्याचाराच्या विरोधात उभ्या राहिल्या आहेत. शिक्षणाच्या व नोकऱ्यांच्या समान संधी, वेतनातील असमानता हे प्रश्न तेथील सुशिक्षित स्त्रियांना अद्याप सोडवायचे आहेत. आजही स्पेनमधील सामाजिक, औद्योगिक व राजकीय क्षेत्रांत स्त्रियांचे प्रमाण अत्यल्प आहे.

**भारत** - इतर देशांतील स्त्रियांचे प्रश्न व भारतातील स्त्रियांचे प्रश्न यांत फारसा फरक नाही. पण भारतीय घटनेने मात्र स्त्रियांना कमी लेखलेले नाही. अनेक कायदे स्त्रियांच्या बाजूने आहेत. सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांत स्त्रियांचा बऱ्याच प्रमाणात सहभाग आहे. आणि आता तर स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना आणखी अधिकार देण्याचे धोरण सरकारने आखले आहे. अर्थात प्रत्यक्षात हे सर्व होणे हा भाग वेगळाच. त्यातही जाती-पातीचा प्रश्न व प्रत्येक राज्यांतील सामाजिक,शैक्षणिक परिस्थिती, या दोन महत्त्वाच्या अडचणी आहेत.

■■

*(संदर्भ - 'नेचर', 'वर्कफोर्स', 'इकॉनॉमिस्ट','इंटरनेट', हिंदू')*

## संततीनियमनासाठी कणसांमधून औषधे !!

एपिसाइट (Epicyte) ही अमेरिकेतील सॅन डिएगो येथील औषधे तयार करणारी कंपनी. नागिण व तत्सम काही रोगांवर, तसेच संततीनियमन करण्याची औषधे तयार करताना प्रोटीन्स प्रकारात मोडणाऱ्या 'अँटीबॉडीज' या घटकाची कंपनीला गरज भासली. त्यांनी 'जेल' प्रकारात या घटकाची निर्मिती केली. पण फार मोठ्या प्रमाणावर जर 'अँटीबॉडीज' हा घटक तयार करायचा झाला तर त्यासाठी स्वतंत्र प्रकल्प, कारखाना उभारावा लागतो. यासाठीची सर्व प्रक्रिया अतिशय खर्चिक व वेळखाऊ होती. त्यामुळे कंपनीने दुसरा मार्ग शोधला. मक्याच्या कणसांच्या झाडांमध्ये हा घटक व्यवस्थितरीत्या व भरपूर प्रमाणात तयार होऊ शकतो, असे कंपनीला संशोधनाअंती आढळले. मानवाच्या शरीरातील पेशीय रचना व झाडांच्या आतील तंतूंची रचना यात बऱ्याच प्रमाणात साधर्म्य असते, असे कंपनीचे प्रमुख अधिकारी मिच हेन यांनी स्पष्ट केले आहे. प्रोटीन्सचा साठा करण्यासाठी कणीस फार उपयुक्त आहे, असेही त्यांना लक्षात आले आहे. त्यामुळे आता फक्त शेतांमधून कणसे पिकवायची व कापणीच्या वेळी, अशा कणसांमधून अँटीबॉडीज काढून घेण्याचे काम करायचे असे कंपनीने ठरविले आहे. अर्थात, ही सर्व झाडांमधील प्रक्रिया 'जैवतंत्रज्ञाना'च्या मदतीनेच सहजशक्य होणार आहे, हे उघडच आहे. या जैवतंत्रज्ञानयुक्त कणसांमुळे जमिनीवर व परिसरातील इतर घटकांवर काय परिणाम होऊ शकतात, याबाबत मात्र कंपनीने मौन पाळले आहे. शिवाय अशी कणसे चुकूनही मानवाच्या आहारात आली तर त्याचे काय ? या प्रश्नाचे उत्तरही शोधण्यात आलेले दिसत नाही. जैवतंत्रज्ञानाच्या अनेक प्रयोगांना जगभरात विरोध होतो आहे. या पार्श्वभूमीवर कंपनीने आपल्या या 'शोधाचे' रूपांतर व्यवहारात करायचे ठरविले तर त्यांनाही विरोधाला सामोरे जावे लागण्याची शक्यता अधिक आहे. अर्थात सध्यातरी ही कंपनी आपल्या संशोधनावर खूष असून ते व्यवहारात आणण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. ■■

## न्यायाची `गवत' पद्धत

अलीकडच्या काळात फार मोठा वांशिक हत्येचा प्रकार घडला तो रवांदामध्ये. रवांदाच्या लोकसंख्येपैकी १४ टक्के लोकांची म्हणजे सुमारे

दहालाख लोकांची कत्तल १९९३-९४ मध्ये, केवळ १०० दिवसाच्या काळात, करण्यात आली. तेव्हापासून सुमारे एक लाख संशयीत आरोपी तुरूंगात डांबले गेले आहेत. आता लवकरच या सगळ्यांची कायदेशीर चौकशी केली जाणार आहे. परंतु नेहमीच्या पद्धतीने एवढ्या कैद्यांची चौकशी करायची तर, शेकडो वर्षेही लागतील. त्यामुळे सरकारने चौकशीचा परंपरागत मार्ग अवलंबायचे ठरविले आहे. आणि त्याला लोकांचाही पाठिंबा आहे.

या पारंपरिक ग्रामीण चौकशीलाच नाव आहे 'गकाका' (म्हणजे गवत) पद्धत. या पद्धतीत समुदायातील लोक गवताच्या कुरणात जमतात, व तेथे दोन कुटुंबातील भांडण मिटवले जाते. न्याय करण्यासाठी या दोन्ही कुटुंबांचे प्रमुखच काम पाहतात. गेल्याच महिन्यात, वांशिक हत्येतील संशयितांच्या चौकशीसाठी दर पन्नास कुटुंबांमागे एकोणिस न्यायाधीश निवडण्यात आले आहेत. अशा निवडलेल्या एकूण न्यायाधीशांची संख्या आहे दोन लाख साठ हजार. हे न्यायाधीश त्यांच्या त्यांच्या मोहल्यांमध्ये न्यायनिवाडा करतील. या पद्धतीने न्यायनिवाड्याचे काम चालविण्यासाठी ब्रिटनने आर्थिक सहाय्य दिले आहे. मानवी हक्क पुरस्कर्त्यांनी मात्र या गकाका न्यायपद्धतीस हरकत घेतली आहे. त्यांचे म्हणणे असे की स्थानिक कम्युन्समधील लोकसंख्येचे स्वरूपच आता बदलून गेले आहे. शिवाय न्याय करणाऱ्यांतच अनेक हत्याकांडात सहभागी झालेले असण्याची शक्यता आहे. ■■

## बीजविद्यापीठ

यावर्षी गांधीजयंतीचा मुहूर्त साधून, डेहराडूनपासून दहा मैलावरील एका खेड्यात 'बीजविद्यापीठ' स्थापन झाले आहे. फारसा गाजावाजा न करता स्थापन झालेल्या या विद्यापीठात 'वसुंधराशिक्षण' दिले जाणार आहे. ही तशी एक नवी संकल्पना आहे. या शिक्षणातून एक अहिंसेची संस्कृती निर्माण व्हावी: त्याकरिता माणूस-प्राणी किंवा माणूस-निसर्ग या परस्परसंबंधांतील प्रश्न सोडविता यावेत अशी कल्पना आहे. 'रिसर्च फौंडेशन फॉर सायन्स, टेक्नॉलॉजी अँड इकॉलॉजी' च्या संचालिका डॉ. वंदना शिवा यांनी 'वसुंधरा लोकशाही शिक्षण' या नवीन विषयावर अभ्यासक्रम तयार केले आहेत. आणि त्यासीठी पहिली 'जंगलातली शाळा' सुरू करण्यात आली आहे. सुरूवातीला केवळ २५ विद्यार्थी घेऊन त्यांना तीन आठवड्यांचा अभ्यासक्रम दिला जाणार आहे. जे कोणी जागतिकीकरणाच्या आणि हिंसक चळवळींच्या विरोधात असतील, ते या अभ्यासवर्गांना एकहजार डॉलर्स शुल्क देऊन नाव नोंदवू शकतील. ■■

## आयर्लंडमधील पंथीय दंगलींचे चिमुकल्यांवर परिणाम

गेले काही दिवस, आयर्लंडच्या उत्तर विभागात कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंटस् यांच्यातील 'पंथीय' दंगली वाढत चालल्या आहेत. बेलफास्टमध्ये अगदी तीन-चार वर्षाच्या शाळकरी मुलांनाही याची झळ पोचू लागली आहे.

बेलफास्टच्या अर्डोनी भागात, दुतर्फा मोठ्या प्रमाणावर प्रॉटेस्टंट लोकांची वस्ती असलेल्या रस्त्यावरून, होली क्रॉस कॅथॉलिक प्रायमरी स्कूलकडे जावे लागते, त्यामुळे या रस्त्यावरून जाणे हा आमचा वहिवाटीचा 'हक्क' आहे असे कॅथॉलिक्सचे म्हणणे, तर या हक्काला प्रॉटेस्टंट्सचा विरोध, शिवाय मुद्दाम आम्हाला खिजविण्यासाठी कॅथॉलिक्स इथून जा-ये करतात असा प्रॉटेस्टंट्सचा आरोप. या परिस्थितीत आईचा हात धरून शाळेत जाणाऱ्या अबोध, निरागस अशा तीन-चार वर्षांच्या मुलींना देखील लोकांच्या शिव्या मिळाल्या. एवढेच नव्हे तर त्यांच्या अंगावर थुंकण्याचे प्रकार देखील घडले. अगदी वयस्कर मंडळीही या दुष्कृत्यात सामील झाली होती. मुली मात्र या अनपेक्षित अनुभवांनी विलक्षण भेदरून गेल्या आहेत. लहान वयात मुलांवर आपण कोणते संस्कार करतो आहोत याचे भान न राहिल्यास, हे तिरस्काराचे बीज वाढत जाऊन दीर्घकालीन दंगलींचीच शाश्वती निर्माण केली जाईल.

■■

......................................................................................................

**अर्थबोधपत्रिका** दिनांक :

*सभासद होण्यासाठी करावयाचा अर्ज*

मला/आमच्या संस्थेला अर्थबोधपत्रिकेचे सभासद म्हणून अंक क्रमांक ..... पासून नोंदवून घ्यावे. पुढील सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- (पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्ट/चेक/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डरने / रोख पाठवीत आहे.

चेक/ड्राफ्टचा तपशील पुढील प्रमाणे ______________________

______________________________________________

**(फक्त पुण्याच्या बँकेवरील चेक पाठवावेत.)**

अंक पाठविण्यासाठी नाव व पत्ता : ______________________

______________________________________________

जिल्हा ____________________ पिन | | | | | | |

## अर्थबोधपत्रिका भेट अंक योजना

अर्थबोधपत्रिका या वैचारिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले अभिनंदन व आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत.

अर्थबोधपत्रिका आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी **आमची योजना अशी की, आपण आपल्या परिचयातील अशा व्यक्तींची नावे व पत्ते पोस्टकार्डने किंवा आंतरदेशीय पत्राने आम्हाला कळवावीत. म्हणजे त्यांना आम्ही एक अंक भेट म्हणून पाठवू. अंक आवडल्यास त्यांना वर्गणीदार होता येईल.**

---

संस्थेतर्फे पुढील पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या आहेत. (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इंग्रजी पुस्तिका) : लेखक - जयकुमार अनगोळ (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण (मराठी पुस्तिका) : लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - रमेश पानसे. प्रत्येक पुस्तिकेची किंमत ३०/- रुपये आहे. पण दिवाळीनिमित्त ती २५/- रुपयांमध्ये देण्यात येईल. यासाठी अंतिम मुदत ३१ डिसेंबर २००१ आहे.

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली जातात. अशा चर्चासत्रात सहभागी होण्याच्या दृष्टीने आपल्या आवडीचे विषय - ______________________

______________________

______________________

**सूचना** ●चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत. **पुण्याच्या बँकेवरीलच चेक मान्य करण्यात येतील.** ●देणगीमूल्य व्यक्ती, संस्था, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये या सर्वांसाठी एकच आहे. ●या नमुना अर्जाच्या झेरॉक्स प्रती किंवा हस्तलिखित प्रतीद्वारे आपण देणगीमूल्य पाठवू शकता. ●आपल्या परिचितांमध्ये अशा प्रती वाटून किंवा आम्हाला त्यांचे पत्ते कळवून आपण, हा अंक अनेक वाचकांपर्यंत पोचविण्यास सहाय्य करू शकता.

## वाचकांच्या प्रतिक्रियांसाठी

कृपया प्रत्येक वाचकाने (केवळ वर्गणीदाराने नव्हे !) खालील मुद्यांच्या आधारे आपल्या प्रतिक्रिया पोस्टकार्ड, आंतरदेशीय पत्राद्वारे किंवा हाच कागद वा याची झेरॉक्स प्रत पाकिटात घालून अवश्य कळवाव्यात ही विनंती.

(योग्य ठिकाणी ✓ टिक करावे.)

१) अंक कसा वाटतो ? उत्तम ☐ बरा ☐ असमाधानकारक ☐

२) आपल्याला आवडलेले लेख १. __________

२. __________ ३. __________

३) आपल्याला न आवडलेले लेख १. __________

२. __________ ३. __________

४) अंकाबाबत व विषयांबाबत आपल्या सूचना १. __________

२. __________ ३. __________

५) आपण नवीन वर्गणीदार नोंदवू शकाल काय ? होय ☐ नाही ☐

**नाव, पत्ता :** __________

## पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत

जे पदव्युत्तर विद्यार्थी एकदम दोन वर्षांची वर्गणी भरतील त्यांना पन्नास टक्के सवलतीत अंक मिळतील. पत्रिकेची दोन वर्षांची वर्गणी १०० रुपये. पदव्युत्तर विद्यार्थ्यांना सवलतीत फक्त ५० रुपये. नोंदणीसाठी अंतिम मुदत ऑगस्ट २००२ किंवा पहिल्या १०० वर्गणीदारांपर्यंत. आपल्या महाविद्यालयाच्या/विद्यापीठाच्या ओळखपत्राच्या झेरॉक्सप्रतीसह वर्गणी रोख/ मनीऑर्डरनेच पाठवावी.

## भेट योजना फक्त ३१ डिसेंबर २००१ पर्यंत

### *खास अर्थबोधपत्रिकेच्या वर्गणीदारांसाठी*

*आपण आपल्या ओळखीच्या पाच व्यक्तींची वार्षिक वर्गणी रुपये २५०/- रोख/म.ऑ.ने एकत्रपणे पाठवा. आपल्यासह त्या सर्वांना भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे पन्नास रुपये किंमतीचे नवे प्रकाशन भेट पाठविले जाईल.*

**शोध घेते ते शिक्षण**

*लेखक : प्रा. रमेश पानसे*

## छान किती दिसते फुलपाखरू !
## पैसे किती देतंसे फुलपाखरू !!

रंगीबेरंगी, आकर्षक, सुंदर अशी अनेक विशेषणं लावता येणारं, निळ्या आकाशाच्या व हिरव्या झाडांच्या पार्श्वभूमीवर भिरभिरणारं आणि पानाफुलांवर अलगद स्थिरावणारं व सर्वांना दृष्टीसुख देणारं फुलपाखरू हा निसर्गाचा अमोल ठेवा आहे. भारतात प्रामुख्याने हिमालयाच्या परिसरात व ईशान्येकडील प्रदेशांत मोठ्या प्रमाणावर व अनेकविध जातींची, लहान-मोठी सुमारे १५०० जातींची फुलपाखरे आढळतात. भारतातील बहुतेक सर्वच प्रदेशांत कोणती ना कोणती फुलपाखरे आढळतातच. भारतातील या नैसर्गिक ठेव्यावर सध्या संक्रांत आली असून या सुंदर फुलपाखरांची चोरटी विक्री मोठ्या प्रमाणावर होत आहे. फुलपाखरांच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेला सध्या फार चांगले दिवस आले आहेत. फुलपाखरे व तत्सम कीटकांचा आंतरराष्ट्रीय व्यापार प्रतिवर्षी सुमारे दोन कोटी अमेरिकन डॉलर्स एवढा आहे. या संदर्भात रशियातून भारतात आलेल्या दोन पर्यटकांना 'वाईल्डलाईफ प्रोटेक्शन कायद्या'अंतर्गत नुकतीच अटक करण्यात आली होती. सिक्कीम येथे ही घटना घडली असून या पर्यटकांना संपूर्ण चौकशी झाल्याशिवाय रशियात परत जाता येणार नाही. जपानमधील दोन नागरिक मात्र पळून गेले आहेत. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना 'बायोपायरसी' असे म्हणतात. भारतातील जैविक विविधतेचे रक्षण करण्यासाठी हा कायदा आहे. फुलपाखरे हा केवळ जैविक विविधतेचा विषय नाही तर नैसर्गिक अन्नसाखळीतील तो एक महत्त्वपूर्ण घटक आहे. भारतातील जैविक विविधचेचे रक्षण करणे हा एक भाग झाला, पण जर भारतातील फुलपाखरांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी असेल तर भारताने त्यांची पैदास वाढवून बाजारपेठेत का उतरू नये ? असा प्रश्न 'वाईल्डलाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया'चे सल्लागार अशोककुमार यांनी उपस्थित केला आहे. परदेशांतील असंख्य पर्यटक हिमालयाच्या परिसरात भटकंती करतात व भरपूर कीटक पकडून नेतात ही वस्तुस्थिती आहे, पण यासंदर्भात योग्य कारवाई यापूर्वी करण्यात आली नाही, असे अधिकारी म्हणतात. ■■

(संदर्भ - 'डाऊन टू अर्थ')

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना :**

- 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे :**

- भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे;
- अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे;
- इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम :**

- संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते.
- संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिर, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.
- अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- नोव्हेंबर १९९८ पासून अर्थबोधपत्रिका प्रकाशित केली जात आहे.


## - संस्थेचे मंडळ -

स. वा. कोगेकर • मृणालदत्त चौधरी • कुमुदिनी दांडेकर

द.ना. धनागरे • आनंद नाडकर्णी • मनोहर भिडे • नीळकंठ रथ

के. एन्. राज • व्ही.एम्.राव • दि.चं. वधवा • सु.म. विद्वांस

ए. वैद्यनाथन • सत्यरंजन साठे • रामदास होनावर